सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

इयत्ता -दहावी

विषय - मराठी

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू -अभ्यास (ब्रीज कोर्स) : इयत्ता- दहावी

- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- कार्यकारी संपादक : **डॉ.कमलादेवी आवटे,**
  उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  श्रीमती नीता जाधव
  उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- संपादन सहाय्य : **डॉ.नंदा भोर,**
  श्रीमती अश्विनी नरवणे,
  विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- निर्मिती गटप्रमुख, **श्रीमती नम्रता शेजाळ,** अधिव्याख्याता, डाएट,रत्नागिरी.
- निर्मिती सदस्य : १. **डॉ.नंदा भोर,** विषय सहायक, मराठी विभाग,
  २. **डॉ. प्रिया निघोजकर,** सहाय्यक शिक्षिका, सु .रा. मुलींची प्रशाला,सेवासदन सोलापूर,
  ३. **विजय सरगर**, सहाय्यक शिक्षक, काडसिद्धेश्वर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कणेरी, कोल्हापूर.
  ४. **अतुल पडोळे,** सहाय्यक शिक्षक जनता गर्ल्स हायस्कूल, शेंदूरजनाघाट, वरुड,अमरावती.

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर अनेक मार्गाने तुमचं शिकणं सुरू ठेवलंत, तुमचं खूप खूप कौतुक ! आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होतयं. पुन्हा जोमानं आपल्याला सुरुवात करायचीय. सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी करायला हवी. जेणेकरून या वर्षीच्या अभ्यासक्रमासाठी आपली चांगली पूर्वतयारी होईल. ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे यासाठीच 'सेतू -अभ्यास' तयार करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकलात? या इयत्तेत आपणाला काय नवीन शिकायचं आहे हे समजून घेण्यासाठी हा अभ्यास तुम्हाला मदत करेल.

त्यासाठी तुम्हाला काय करायचं ? तर हा सेतू-अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवायचा आहे. यात वेगवेगळ्या कृतींचा समावेश आहे. या कृती सोडवताना तुम्हाला मजा येईल. पण लक्षात ठेवा, या कृती इथे दिलेल्या नियोजनाप्रमाणे व स्वतः सोडवायच्या आहेत. सोडवताना काही अडचण आली तर शिक्षक आणि पालक मदत करायला आहेतच. हा ४५ दिवसाचा अभ्यास करताना दर पंधरा दिवसांनी तुम्हाला एक छोटीसी चाचणी सोडवायची आहे. चाचणी स्वतः एकट्याने सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर ती तुमच्या शिक्षकांकडून तपासून घ्या. शेवटी दिलेल्या उत्तरसूचीच्या मदतीने आपल्या उत्तरांची तुम्ही खात्रीही करू शकता. चाचणीत न जमलेल्या भागाची पुन्हा तयारी करा.

हा अभ्यास सोडवताना काही भाग समजला नाही किंवा अवघड वाटला तर काळजी करू नका. तो समजून घेण्यासाठी तुमच्या शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू- अभ्यास पूर्ण करण्यासाठी तुम्हांला मनःपूर्वक शुभेच्छा !

शिक्षक-पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची पूर्व तयारी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू-अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू-अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.

- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.

- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला आहे. तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.

- सदर अभ्यासात क्षेत्र,कौशल्य,संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.

- संकल्पनेप्रमाणे **'जाणून घेऊ या'** मध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या',** त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या,'** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे. .

- 'संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी तुम्ही दीक्षा ॲप, क्यू. आर. कोड इ.ची मदत घ्यावी.

- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू -अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू -अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.

- 'चला सराव करू या' हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.

- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

- वयानुरूप समकक्ष वर्गातील मुलांसाठी SCERT मार्फत तयार केलेल्या विद्यार्थी-मित्र व शिक्षक-मार्गदर्शिका यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा.

अनुक्रमणिका

अ. क्र .	घटकाचे नाव	दिवस
१	काव्यानंद	१
२	गद्य भाग- १	२/ ३
३	पद्य भाग-१	४ /५
४	स्थूलवाचन भाग- १	६/७/८/९
५	भाषा अभ्यास अलंकार -भाग १	१०/११
६	उपयोजित लेखन कथा	१२
७	गद्य भाग -२	१३/१४
८	चाचणी	१५
९	पद्य भाग-२	१६/१७
१०	भाषाभ्यास - रसविचार	१८
११	उपयोजित लेखन कथा २	१९
१२	गद्य भाग -३	२०/२१
१३	पद्य भाग-३	२२/२३
१४	भाषाभ्यास - समास	२४
१५	उपयोजित लेखन कथा- ३	२५
१६	गद्य भाग-४	२६/२७
१७	पद्य भाग-४	२८/२९
१८	चाचणी	३०

अ. क्र .	घटकाचे नाव	दिवस
१९	भाषाभ्यास- वाक्यप्रचार	३१
२०	उपयोजित लेखन बातमी १	३२
२१	भाषाभ्यास - समानार्थी शब्द	३३
२२	उपयोजित लेखन बातमी -२	३४
२३	उपयोजित लेखन – पत्रलेखन १	३५
२४	भाषाभ्यास विरुद्धार्थी शब्द -१	३६
२५	उपयोजित लेखन आत्मकथन	३७
२६	भाषाभ्यास - वचन	३८
२७	उपयोजित लेखन प्रसंग लेखन –भाग २	३९/४०
२८	भाषाभ्यास - लेखन नियमांनुसार लेखन	४१
२९	उपयोजित लेखन बातमी -३	४२
३०	भाषाभ्यास-विरामचिन्हे	४३
३१	उपयोजित लेखन – पत्रलेखन २	४४
३२	चाचणी	४५





महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू-अभ्यास कृती आराखडा

इयत्ता – दहावी **विषय – मराठी** **कालावधी – ४५ दिवस**

➢ उद्दिष्टे:-

१. कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.

२. विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेचे भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.

३. विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार व क्षमतेनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.

४. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.

५. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

➢ अपेक्षित कौशल्य/ संकल्पना(इयत्ता निहाय):-

१. मौखिक भाषा विकास- श्रवण,भाषण संभाषण .....

२. भाषाभ्यास – व्याकरण घटकावर आधारित /भाषिक घटकावर आधारित

३. वाचन- गद्य व पद्य पठित /अपठित उतारे

४. लेखन – उपयोजित लेखन

दिवस

१

कौशल्य-:

गाणी, कविता ,समूह गीते योग्य अभिनयासह व योग्य आरोह-साहित्य प्रकारांच्या ध्वनिफिती समज . अवरोह सह म्हणता येणे पूर्वक ऐकता येणे

क्षेत्र –

श्रवण /

१ . वंद्य 'वन्दे मातरम्'

वेदमंत्रांहून आम्हां वंद्य 'वन्दे मातरम्' !

माउलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती
त्यांत लाखो वीर देती जीवितांच्या आहुती
आहुतींनी सिद्ध केला मंत्र 'वन्दे मातरम्' !

याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले
शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले
शस्त्रहीनां एक लाभो शस्त्र 'वन्दे मातरम्'

निर्मिला हा मंत्र ज्यांनी, आचरीला झुंजुनी
ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाउनी
गा तयांच्या आरतीचे गीत 'वन्दे मातरम्' !



शिक्षकांनी प्रस्तुत गीत विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे तसेच समूह . गीताच्या ध्वनीफिती ऐकवाव्यात .

FHAR25

दिवस

२ /३

कौशल्य /संकल्पना -:

विविध साहित्यप्रकाराचे समजपूर्वक वाचन करणे,मूल्यमापन करणे,चिकित्सक विचार करून स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे/.ललित साहित्य –अनुभव कथन

क्षेत्र -वाचन

लेखन

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे गटात प्रकटवाचन करण्यास सांगावे व आशय समजून घेण्यासाठी खाली दिलेल्या प्रश्नाप्रमाणे विविध प्रश्न विचारून अनुभव कथन या ललित साहित्य समजून घेण्यास मदत करावी.

जंगलातून फिरताना आपल्याला अनेक आवाज एकू येतात.उंच उंच गवतातून पाण्याकडे येणारे हिंस्र प्राणी पाहून पक्षी मोठ्याने आवाज करत उंच उडतात,तर शिकार होणारे प्राणी –जसे हरिण,सांबर व काळवीट मोठ्या आवाजात ओरडत धोक्याची सूचना देतात. वन्य प्राण्यांच्या पावलांचे ठसे, शिकार करण्याची पद्धत, विष्ठा व झाडाझुडपावरील त्यांच्या नख्यांच्या खुणा,त्यांचे विविध आवाज यावरून त्यांची आपल्याला ओळख होते.ही एक प्रकारची अरण्यलिपीच होय.जंगलवाचनाचा आपल्याला छंद लागला की डोळ्यांनी कानांनी नाकाने आपण प्राण्यांच्या अनेक गोष्टी जाणतो.प्राण्यांचे आवाज, पायांचे ठसे वास आपल्याला प्राण्यांच्या जगाशी एकरूप करतात.ओढा नदीकाठ माळरान डोंगरदऱ्या ओहळ झाडेझुडपे या सगळ्यांशी जवळीक निर्माण होते.कुठलेही जंगल आपल्याला कंटाळवाणे वाटत नाही कारण जंगलवाचनाचा अनुभव आपल्याला नवीनवी माहिती आणि वेगळ्याच स्वरूपाचा आनंद मिळवून देतो.

१) वरील उताऱ्यातील माहितीचे निवेदन कोण करत आहे ?

२) उताऱ्यात वर्णन केलेल्या घटकाचे नाव -.....

३) उताऱ्यात वर्णन केलेल्या घटकाच्या विशेष बाबीं. १).....२).....3).....४).....५).....

४) एका शब्दात उत्तर द्या.लेखकाने आपल्या या छंदाला दिलेले नाव-

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उताऱ्याचे मूक अथवा गटात प्रकटवाचन करण्यास सांगा. वरीलउताऱ्यातील अनुभवाशी त्यांनी वाचलेल्या किंवा पाहिलेल्या प्राण्यांशी तुलना करण्यास सांगून आकलन क्षमता जाणून घ्या .

सक्षम बनू या

शिक्षकांनी अनुभव कथन ही संकल्पना अधिक दृढ होण्यासाठी वरील उताऱ्यासारखे उतारे घेऊन विद्यार्थ्यांना ललित लेखातील विषयी गटात चर्चा करण्यास सांगावी.


मोगरा, निशिगंध ही जशी सुगंधी फुले तसाच गुलाब; पण ह्या स्वारीचा रुबाब काही औरच असतो. गुलाबासारखे सोपस्कार करून घेणारे झाड मी तर पाहिलेच नाही. गुलाबाला वाटेल ती जागा चालणार नाही, पाणी कमी झाले तरी त्याला सोसणार नाही नि अधिक झाले तरीही सोसणार नाही. त्याला खत वेळच्या वेळी मिळाले पाहिजे, मुळे मोकळी झाली पाहिजेत, हंगाम साधून छाटणी केली पाहिजे, कीड टिपून मारली पाहिजे, एवढे सगळे करावे तेव्हा हे राजेश्री फुलणार. एकदा गुलाब प्रसन्नपणाने फुलू लागला, की केलेले सगळे श्रम मनुष्य विसरून जातो. नव्हे, त्याचे सारे श्रम भरून येतात. गुलाबाच्या फुलाची ऐट काय वर्णावी? किती त्याचे आकार, किती रंग, किती गंध! त्यांना सीमा नाही. त्यावेळी मी आयुष्यात प्रथमच काळा गुलाब पाहिला! काळसर मखमलीसारख्यापाकळ्यांचे ते फूल म्हणजे एक अजब चीज होती. सायलीची वेल एकदा आळे करून लावली, की मग तिच्याकडे फारसे लक्ष नाही दिले तरी चालते. बाराही महिने ती फुललेली राहते. पारिजातक तर कमालीचा निरिच्छ. तो कोठेही लावा. त्याला पाणी द्या नाहीतर देऊ नका. पावसाळी ढग आभाळात भरून आले आणि त्यातून अमृताचा शिडकाव सुरू झाला की ह्या रांगड्या झाडाला कसला आनंद होतो कोणास कळे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करण्यास सांगावे व पुढील कृतींद्वारे ललित साहित्यातील अनुभव कथन ही संकल्पना दृढ करण्यासाठी मार्गदर्शन करावे.

चला सराव करू या

कृती-

- **आकृती पूर्ण करा**



- **कोष्टक पूर्ण करा**

फुलाचे नाव	विशेष
गुलाब	
पारिजातक	
सायली	

- **उताऱ्यात आलेल्या निसर्गातील घटकांमध्ये दिसणाऱ्या मानवी भावनाची विधाने सांगा/ लिहा.**
- **गुलाबाच्या फुलाचे विशेष सांगा /लिहा .**
- **मानवी स्वभावाच्या कोणत्या पैलूचे वर्णन प्रस्तुत उताऱ्यात आले आहे ते शोधा.**

कल्पक होऊ या

- विविध अनुभव कथन या साहित्य कृती मिळून त्यांचे गटात वाचन करा.
- तुम्हांस आवडलेल्या एखाद्या साहित्यकृतीतील विचार इतर वेगवेगळ्या गटात तुमच्या शब्दात व्यक्त करा.

दिवस
४ /५

क्षेत्र
श्रवण,वाचन, लेखन

कौशल्य -साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे. आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे. साहित्याच्या आशयावरील काढलेल्या टिपणांच्या मुद्दयांचा विस्तार करता येणे.संकल्पना - पद्य

जाणून घेऊ या

गावाच्या पूर्वेकडून नागमोडी वळणे घेत नदी वाहते.तिच्या मनात काय चालते हे अद्याप कळले नाही.	गावाच्या पूर्वेकडून नदी वाहते घेत नागमोडी वळणे काय तिच्या मनात चालते हे अद्याप नाही कळले

शिक्षकांनी पुढील उदाहरणाच्या मदतीने विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी.गद्य व पद्यातील फरक सांगू शकतात का हे जाणून घ्यावे.

जसे पुढील उदाहरण पहा ....उदा.२

बदका बदका नाच रे,तुझी पिल्ले पाच रे,

एक पिल्लू हरवले,बागेत जाऊन लपले

तिकडून आले पोलीस दादा,ते म्हणाले बाळ तू कोणाचा?

मी माझ्या आईचा आई गेली कामाला,मी जातो शाळेला.

कृती- योग्य पर्याय निवडा.


१)वरील बडबडगीताचा विषय....

अ)बदकाचे पिल्लू ब)पोलीस दादा क) बदकाची आई ड) बदकाच्या पिलाची शाळा

२) वरील बडबडगीतात लय निर्माण करणारे शब्द सांगा. - जसे नाच-पाच तसे.....

३)बदकाच्या पिलात लपलेली प्रतिमा.....

४)बडबडगीतात आलेले मानवेतर घटक .....



शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उदा.१ व उदा.२ मधील फरकाबाबत चर्चा करण्यास सांगावे व पुढील कृतींच्या मदतीने विद्यार्थ्यांना कवितेतील घटक समजून द्यावेत.तसेच वरील उदाहरणा बाबत चर्चा करावी.शब्दांची योग्य जुळणी झाली का पहा.

सक्षम बनू या

शिक्षकांनी ही संकल्पना अधिक दृढ होण्यासाठी सर्व घटक समावेशक अशी कविता घेऊन विद्यार्थ्यांना काव्यातील घटकांविषयी गटात चर्चा करण्यास सांगावी.

तापीकाठची चिकणमाती ओटा तरी बांधू ग बाई
असा ओटा चांगला तर जात तरी मांडू ग बाई.
अस जात चांगल तर सोजी तरी दळू ग बाई
अशी सोजी चांगली तर लाडू तरी बांधू ग बाई
असे लाडू चांगले तर शेल्याच्या पदरी बांधू ग बाई
असा शेला चांगला तर भाऊराया भेटू ग बाई
असा भाऊ चांगला तर दारी रथ आणील ग बाई
असा रथ चांगला तर नंदी तर जुंपिन ग बाई
असा नंदी चांगला तर माहेराला जाऊ ग बाई
असं माहेर चांगले तर धिगामस्ती करू ग बाई.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कविता चालीवर म्हणण्यास सांगावी, मध्यवर्ती कल्पना सांगण्यास सांगावी.काव्याच्या अनुषंगाने येणाऱ्या घटकाविषयी वरीलप्रमाणे विविध कृतीद्वारे काव्याची वैशिष्ट्ये तयार करण्यासाठी मार्गदर्शन करावे.

उदा.

- कवितेचा विषय :- .....
- विषयाच्या अनुषंगाने कवितेत आलेले घटक-.....
- नाद, लय निर्माण करणारे शब्द .....

चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कवितेच्या आधारे पुढील कृती सोडविण्यास सांगाव्यात तसेच इतर वेवेगळ्या कवितांच्या मदतीने आशय कसा समजून घ्यावा याचे दृढीकरण करावे.

- **एका शब्दात उत्तर द्या.**

१ . कवितेत आलेल्या नदीचे नाव.....

२ . कवितेतील स्त्रीला नेण्यासाठी भाऊराया आणणार आहे ते वाहन ...

३ .चूक की बरोबर ते सांगा

४ .कवितेतील स्त्रीच्या मते माहेरात धिंगामस्ती घालायला मिळते.

- **पुढील काव्य पंक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ सांगा/लिहा .**

असा भाऊ चांगला तर दारी रथ

आणील गं बाई.

कल्पक होऊ या

वरील कवितेत काही शब्दांच्या जागी समानार्थी शब्द टाका व काव्यात काय बदल होतो तो पहा.

दिवस
६ /७ /८ /९

क्षेत्र - भाषण संभाषण

वाचन लेखन

कौशल्य / संकल्पना:-

साहित्य समीक्षा रसास्वाद

स्वानुभव लेखन संदर्भासाठी कोश

हाताळण्याचा सराव इ.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी अवांतर संदर्भ साहित्याचा आधार घेऊन पुढील प्रमाणे काही उतारे निवडावेत. त्यांचे वर्गात प्रकट वाचन घेऊन त्यावर आधारित छोट्या-छोट्या कृती तोंडी सोडवून घ्याव्यात। नंतर त्याचे वहीत लेखन करण्यास सांगावे.

कोकणातल्या समुद्रकिनाऱ्याजवळच्या एका गावी सहज सहलीसाठी गेलो होतो. सोबत परिवार होता. निसर्गाच्या सहवासात दोन दिवस रहावं, जरा परिसर बदल अनुभवावा असं काहीसं मनात होतं आणि तसंच घडत होतं. आम्हा साऱ्यांची मनं मोकळा अवकाश पाहून फुलून आली होती. कौलारू छपरांची घरं, अंगणपरसातली माडापोफळींची, फणसांची झाडं, लाल मातीच्या पायवाटा, समुद्राची अखंड गाज आणि हवेत तरळणारा एक समुद्रकाठच्या गावमातीचा गंध... मन थाऱ्यावर होतं आणि नव्हतंही.

संध्याकाळची वेळ होती. वर्दळ नसलेला समुद्र किनारा, दूरवर पसरलेली फिकट पिवळ्या वाळूची ओलसर पुळण. उन्ह कलतं झालेलं. समुद्राच्या उसळत्या लाटा सोनेरी रंग माखून किनाऱ्याकडं परतत होत्या. समुद्रावर दूर क्षितिजाच्या पलीकडं तो तेजाचा गोळा केशरी झालेला होता. साऱ्या वस्तुमात्रावर एक विलक्षण मोहिनी पसरलेली. काही पर्यटकांचे, तरुण मुलांचे सूर्यास्ताचा फोटो काढण्याचे प्रयत्न चाललेले. सूर्य अथांग पाण्यात बुडतानाचे दृश्य पाहताना शब्द मावळले. दिठीनं खोल आत घेतलेला तो एक नितांत सुंदर सूर्यास्ताचा देखावा मनात उरला.

मी आता पायांतल्या चपला काढून पुळणीवर ठेवल्या. साऱ्यांतून स्वतःला बाजूला सारून समुद्राचा झालो. मला वाटलं, एक अपार मोकळीक आणि असीम सुंदरता माझ्या आत आणि बाहेर पसरलीय. आणि तीच सर्वदूरही आहे.

कृती –

१) कोकण सौंदर्यातील लेखकाने टिपलेली सौंदर्यस्थळे सांगा.

२) ' माणसाला निसर्ग सहवासाची ओढ आहे ' याविषयी तुमचे मत सांगा.

३) तुम्ही अनुभवलेल्या अशा सुंदर क्षणांचे वर्णन करा.

४) प्रस्तुत उताऱ्यातील तुम्हाला नवीन वाटलेल्या शब्दांची यादी करा.

५) उताऱ्यातील तुम्हाला आवडलेली वाक्ये लिहा.

६) 'साऱ्यांतून स्वतःला बाजूला सारून समुद्राचा झालो' या वाक्याचे चिंतन करा. मनात येणारे विचार शब्दात मांडण्याचा प्रयत्न करा.

७) उताऱ्यात आलेले वाक्प्रचार शोधून त्यांचा अर्थ व वाक्यात उपयोग करा.

८) उताऱ्यास समर्पक शीर्षक द्या.

‘स्थूलवाचन’ या नवीन विभागाची तोंडओळख’
शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उदाहरणाप्रमाणे करून द्यावी.

पाठ्यपुस्तकातील ‘स्थूलवाचन’ या नवीन विभागाशी तुम्हाला गट्टी करायचीच. तुम्हाला चिकित्सक विचार करायला लावणारा, लिहितं करणारा हा विभाग आहे. खरंतर स्थूल म्हणजे साधारण; वरवरचं असं पण येथे केवळ स्थूलवाचन न करता दिलेल्या घटकाचा सखोल, सूक्ष्म अभ्यास तुम्ही करायचा आहे. प्रवासवर्णन, वैचारिक लेख, कोश वाङ्मय आदींचा या विभागात समावेश असतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे मौन वाचन करण्यास सांगावे. सरावासाठी ९ वी स्थूलवाचनाच्या आधारे अशा प्रकारचे नमुना उतारे तयार करावेत. प्रारंभी दोन कृती सोडवण्यास द्याव्यात. उताऱ्यावर आधारित किमान चार ते पाच कृती तयार करण्यास प्रोत्साहित करावे.

सक्षम बनू या



एक दिवस मी या उद्यानातून त्या उद्यानात भटकत भटकत सेंट जेम्स बगिच्यात पोचले व तळ्यातील पोहणाऱ्या पक्ष्यांकडे पाहत होते. सगळीकडे मंद रुपेरी प्रकाश पडला होता. एकाएकी मला चमत्कारिक वाटले, की प्रकाश खालून वर फाकला आहे. मी परत नीट भोवताली व वर पाहिले. खरेच आकाश अभ्राच्छादित होते. अगदी काळे जरी नसले तरी सूर्याचा मागमूसही नव्हता. खाली तळ्याच्या पाण्यावर व मधल्या दगडावर बर्फाचा पातळ थर साचला होता व त्यातून परावर्तन पावून प्रकाश सर्वत्र फाकला होता. यामुळे प्रकाश खालून वर गेल्यासारखा वाटला. या विशिष्ट प्रकाशात सर्वच रंग आंधळे वाटतात. कधी एखाद्या दिवशी सूर्यप्रकाश पडला व तोही वसंतऋतूत फुलांनी बहरलेल्या ताटव्यावरून व हिरव्या कुरणावरून पडला, म्हणजे रंगाने नटलेली सृष्टी डोळ्यांपुढे नाचते; पण तरीही येथल्या सृष्टीतले रंग व आपल्याकडच्या सृष्टीतील रंग यांत फरक आहे. येथे सर्वच रंग जरा मंद व सौम्य वाटतात. जशा दाट छाया; पण आपापल्या भडकपणाने उठून न दिसता एकमेकांना पूरक अशा भासतात.

कृती-

१) लेखिका फिरावयास गेली ते ठिकाण कोणते ते लिहून चित्राच्या आधारे त्याचे वर्णन करा.

२) उताऱ्याच्या आधार विधान पूर्ण करा.

अ) तळ्यात पोहणारे पक्षी---

ब) 'रूपेरी' ला पर्यायी शब्द ----


क) ढगांसाठी उताऱ्यात आलेला शब्द----

ड) वसंतऋतूत फुलणारे दोन फुले ---

३) ---------- ४) ---------- ५) ---------- 6) ----------

चला सराव करू या

शिक्षकांनी पुढील व्यंगचित्राप्रमाणे काही व्यंगचित्रे संकलित करावी. चित्रपट्ट्यांचे वर्गात गटनिहाय वाटप करावे. विद्यार्थ्यांना आपापसात त्या चित्राविषयी चर्चा करण्यास प्रेरित करावे. नंतर स्वतंत्रपणाने चित्रावर आधारित त्यांना किमान एक परिच्छेद लिहिण्यास सांगावा. ही विद्यार्थ्यांची स्वतंत्र अभिव्यक्ती असल्याने त्यांना येणाऱ्या शंकांचे निरसन करावे लिहिण्यासाठी विश्वास निर्माण करावा.



कल्पक होऊ या

अ)



ब)



कृती 2 -

मुलांनो हे चित्र बारकाईने पाहा. याविषयी आंतरजालावरून अधिक माहिती मिळवा आणि थोडक्यात वहीत लिहा. 'विश्वकोश गौरवगीत' शोधून ते ऐका.





दिवस
१०/११

जाणून घेऊ या

क्षेत्र – लेखन :क्षमता

१ लेखन करताना अलंकाराचा वापर करता येणे .

संकल्पना- अलंकार

अजय : हे काय आहे तुझ्या हातात ?

सुजय : धोतऱ्याचं फळ

अजय : कोरोंना व्हायरसपण या फळांसारखाच दिसतो. टाकून दे बरं

सुजय : खरंच की धोतऱ्याचं फळ जणू कोरोना व्हायरसचं मॉडेलच

(फळ टाकून देतो.)



अजय : अरे पण दोघांच्यात जमीन-आसमानाचा फरक आहे.

सुजय: दोघेही मानवाच्या जीवाला धोकादायक

अजय : कोरोंना धोतरा भाऊ –भाऊ

सगळ्यानी मिळून त्याला पळवून लावू

सुजय : मित्रा तुला तर चांगलं यमक जुळवता येतं की

अजय : पण काहीही म्हण धोतऱ्याच फळ डोळ्याला दिसते. त्याला आपण नष्ट करू शकतो. त्याच्यापासून आपण दूर राहू शकतो . परंतु ; कोरोंनाचा विषाणू महाभयानक! तो आपल्याला जवळ करेल सांगता येत नाही.

सुजय : नेमक बोललास मित्रा ! मानलं तुला.

अजय : कोरोंनाचा सहवास घडवी विनाश

जैसे दुर्जनांच्या संगे धोका सज्जनास

सुजय : अरे व्वा! लाजाळूचं झाड आज कविता करायला लागलंय.

अजय : माझ्या सोबत राहशील तर तू ही कवी बनशील. चल निघूया नाही तर पाठीत धपाटे बसतील.

(दोघेही हसत हसत घराकडे जातात.)

शिक्षकानी वरील संवाद विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा. विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी. गटात चर्चा करण्यास सांगावे.

१) वरील संवादामध्ये कोण-कोणते अलंकार आले आहेत ?

२) संवादामध्ये यमक जुळविणारे कोणते शब्द आले आहेत.

३) लाजाळूच झाड आज कविता करायला लागलय. या ओळीत कोणता अलंकार आला आहे ?

४) **धोतऱ्याच फळ** आणि कोरोंना विषाणू यांच्यातील समान गुणधर्म ओळखून लिहा. ----------

शिक्षकानी वरील संवादातील चर्चेप्रमाणे विविध उदाहरणे देऊन उपमेय,उपमान,साम्यवाचक शब्द व समानगुणधर्म या संकल्पना जाणून घ्याव्यात.

सक्षम बनू या

१ शाळा ही दुसरी माताच.

२ परीहून सुंदर असे ही चिमूरडी ।
गालावर विलसे चांदण्याची खडी ।।

३ चाफा बोलेना। चाफा चालेना ।
चाफा खंत करी ।काही केल्या फुलेना ।

४ चंदनाचे हात पायही चंदन । तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।।
पाहता अवगुण । मिळेचिना ।।

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने उपमेय, उपमान , साम्यवाचक शब्द व समानगुणधर्म या विषयी चर्चा करून रुपक, व्यतिरेक,चेतनगुणोक्ती व दृष्टान्त या अलंकाराची ओळख करून देताना लक्षणे व अधिक उदाहरणे द्यावीत.

१ जग ही एक रंगभूमी आहे.

२ अमृताहुनी गोड नाम तुझे देवा

३ ओलेत्याने टिपते डोळे
वसुंधरा हसता हसता

४ लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने उपमेय, उपमान , साम्यवाचक शब्द व समानगुणधर्म या विषयी चर्चा करून रुपक, व्यतिरेक,चेतनगुणोक्ती व दृष्टान्त या अलंकाराची ओळख करून द्यावी.

चला सराव करू या

खालील उदाहरणामध्ये कोणते अलंकार आहेत ओळखून लक्षणे लिहा.

१ ओघळत्या या आभाळाच्या, डोळ्यांमध्ये थेंब निळे

२ हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे

३ ससा तो कसा ।
कापसाहूनही मऊ जसा ॥

कल्पक होऊ या

-
- **अलंकाराच्या प्रकारानुसार उदाहरणांचा पाठ्यपुस्तकात शोध घ्या.**
- **कवितेचा अभ्यास करताना आलंकारिक रचना पहा.**
- **आंतरजालाद्वारे अलंकाराची अधिक माहिती मिळवा.**

पूरक साहित्य स्रोत :-

- **इयत्ता ९ वी कुमारभारती या पाठ्यपुस्तकातील अलंकार हा भाषाभ्यास घटक**
- **मराठी व्याकरण पुस्तके**

दिवस
१२

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य

१ दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे .

२ म्हणी,वाक्प्रचार ,सुभाषिते, कल्पना विस्तार यांचा लेखनात प्रभावी वापर करता येणे

संकल्पना:-
कथालेखन

जाणून घेऊ या



शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बाजूच्या चित्रकथेचे निरीक्षण करण्यास सांगून विद्यार्थ्यांसोबत कथेतील पात्रे याविषयी चर्चा करावी.

२. सोबतच्या चित्रकथेमध्ये कोणकोणते प्राणी आले आहेत? यादी तयार करा.

१. सोबतच्या चित्रकथेमध्ये ठिकाण कोणते.
१ गाव २ बाग ३ सर्कस ४ जंगल

३. सोबतच्या चित्रकथेला काय नाव द्याल ?

४. सोबतच्या चित्रकथेचे निरीक्षण करून कथा लिहा ?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट तयार करून वरील कथेतील पात्रे, घटना व घटनाक्रम, स्थळ, सुसंगतता या विषयी गटात चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी वरील प्रकारे सोप्या प्रश्नातून विद्यार्थ्यांकडून कथेविषयी जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी कथालेखन अधिक दृढ होण्यासाठी पुढील कथेच्या मुद्द्यांचे वाचन करण्यास सांगावे.

एका गावात एक म्हातारी -----पती आजाराने ग्रस्त होता. –मोलमजुरी-- म्हातारी स्वाभिमानी-- जंगलात लाकडे तोडून दमली - लाकडांची मोळी बांधली पण मोळी उचलली जाईना-- वैतागली देवाला विनवणी -- "देवा, आता या उतारवयात ही मोळी जर माझ्याने उचलली जात नसेल; तर मला तरी उचल बाबा." मृत्युदेव हजर होताच- घाबरणे --------" मला आताच मरायचे नाही, मी जर मेले तर माझ्या आजारी पतीची सेवा कोण करील? -------समर्थता दर्शविते---- पूर्ण ताकदीने लाकडाचा भारा उचलुन घरी जाणे .

तात्पर्य- जीवनापासून पळ काढणे म्हणजे समस्येचे निरसन नाही. संघर्षाला सामोरे जाणे, संघर्ष करत राहणे, आपले नित्यकर्म करत राहणे यातच मानवी जीवनाचे सूत्र बांधले आहे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील मुद्द्यावरून कथा लिहायला सांगावी व पुढील कृतींच्या मदतीने कथा लेखनाची वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

१)कथेचा काळ ----------

२)कथेतील पात्र ----------

३)कथेचे तात्पर्य ----------

४)कथेतील घटना----------

५) कथेचे शीर्षक ----------

चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील चित्राचे निरीक्षण करून त्यावर आधारित कथा लिहिण्यास सांगावी व योग्य शीर्षक देऊन तात्पर्य व म्हण ओळखण्यास सांगावी.



शिक्षकांनी अशा प्रकारची विविध उदाहरणे देवून कथा या घटकाचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या

- शीर्षकावरून कथा लिहा. उदा . चतुर कावळा
- शब्दावरून कथा लिहा –विद्यार्थी –पाकीट –मुख्याध्यापक- सत्कार
- कथा बीजावरून कथा लिहा – एकीचे बळ
- अपूर्ण कथा पूर्ण करा. (पूर्वार्ध अथवा उत्तरार्ध देवून)

वरील प्रमाणे कथालेखनाच्या विविध कृती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्याव्या .

❖ **पूरक साहित्य स्रोत**

दीक्षा ॲप

क्यू. आर. कोड इ.

दिवस
१३ /१४

क्षेत्र –वाचन /लेखन

कौशल्य / संकल्पना:-

विविध साहित्यप्रकाराचे समजपूर्वक वाचन करणे,मूल्यमापन करणे,चिकित्सक विचार करून स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे./

ललित साहित्य – आत्मचरित्र

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत:विषयी व्यक्त होण्यास सांगावे.(उदा. विद्यार्थ्यांना त्यांच्या आता पर्यंतच्या आयुष्यातील प्रसंग सांगण्यास सांगावा.) आत्मचरित्र म्हणजे स्वत:विषयी व्यक्त झालेला आत्मविष्कार,विद्यार्थ्यांना याविषयीची किती माहिती आहे ती विविध उदा.द्वारे जाणून घ्यावे.

डॉ.कलाम यांचे बालपण

माझ्या बालपणीच्या जगात पुस्तकं म्हणजे माझ्यासाठी एक दुर्मिळ वस्तू होती . आमच्या गावात एस.टी.आर. माणिकम नावाचे एक क्रांतिकारक राष्ट्रभक्त राहत होते. त्यांच्याकडे पुस्तकांचा बऱ्यापैकी संग्रह होता. त्यांनी मला पुस्तके वाचण्यासाठी सदैव उत्तेजन दिले. मीही मिळेल ते वाचत गेलो. पुस्तके मागण्यासाठी मी त्यांच्या घरी धाव घेत असे. माझ्या लहानपणी शमसुद्दीन नावाच्या माझ्या एका दूरच्या भावाचा माझ्यावर बराच प्रभाव होता. रामेश्वरममध्ये येणाऱ्या वर्तमानपत्रांचा तो एकुलता एक वितरक होता. रोज सकाळच्या रेल्वेगाडीने 'पंबन' गावाहून वृत्तपत्रांचे गठ्ठे येत. गावातल्या हजारभर सुशिक्षितांच्या वाचनाची गरज भागवणाऱ्या शमसुद्दीनचा व्यवसाय म्हणजे एकखांबी तंबू होता. स्वातंत्र्याच्या चळवळीची वाटचाल ग्रामस्थांना समजणे हे महत्त्वाचे कार्य त्यातून साधत असे. कुणाला भविष्य जाणून घेण्यात रस असे, तर कुणी चेन्नईच्या (मद्रास) बाजारपेठेतले सोन्याचांदीचे भाव समजण्यासाठी उत्सुक असत. थोडेजण जिज्ञासूवृत्तीने हिटलर, महात्मा गांधी आणि बॅरिस्टर जीनांबद्दल गांभीर्याने चर्चा करत; पण झाडून सर्वजणांना पेरियार ई. व्ही. रामस्वामी यांच्या चळवळीबद्दल जाणून घेण्यात रस होता. 'दिनमणी' हे त्या वेळचे सर्वांत लोकप्रिय 'तमिळ' वर्तमानपत्र होते. छापलेले शब्द त्यावेळी मला वाचायला येत नसत. त्यातील चित्रांकडे बघून मी समाधान मानत असे. शमसुद्दीन आपल्या गिऱ्हाइकांना पेपरचा अंक वाटण्यापूर्वी मी त्यातील चित्रे बघून घेत असे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उताऱ्याचे मूक अथवा गटात प्रकटवाचन करण्यास सांगावे व पुढील कृतींच्या मदतीने त्यांनी सांगितलेल्या माहितीशी तुलना करण्यास सांगावे.उदा.विद्यार्थी –निवेदक

- वरील उताऱ्याचे निवेदक .....
- उताऱ्यात कोणाविषयी सांगितले आहे.
- लेखकाच्या बालपणीच्या कोणत्या घटनेचे वर्णन प्रस्तुत उताऱ्यात आले आहे.
- उताऱ्यात वर्णन केलेल्या घटनेशी संबंधित असणारी व्यक्ती.
- घटनेशी संबंधित असणारी व्यक्तीचे विशेष ....
- उताऱ्यात लेखकाने स्वत:बद्दलची कोणती विशेष बाब सांगितली आहे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी आत्मचरित्रात्मक लेखाच्या दृढी करणासाठी वरील उताऱ्यासारखे उतारे घेऊन विद्यार्थ्यांना आत्मचरित्रात्मक लेखात येणाऱ्या पुढील घटक लक्षात घेऊन सबंधित उताऱ्याची किंवा पाठाची गटात चर्चा करण्यास सांगावी.

१
- लेखकाच्या स्वत:च्या व्यक्तिमत्वाचे दर्शन
- लेखकाचे जीवनविषयक अनुभव

२
- लेखकाने विविध घटकांविषयी,व्यक्तीविषयी किंवा प्रसंगाविषयी व्यक्त केलेले विचार
- लेखकाच्या संबंधित काळातील वातावरणाचे केलेले वर्णन.


३
- आत्मचरित्रात लेखक स्वत:केंद्रस्थानी असतो.

चला सराव करू या

अण्णांचा निरोप घेऊन मी घरी आलो, तिसऱ्या दिवशी अण्णांच्या भेटीस गेलो असता मोडक्या टेबलावर तुटक्या खुर्चीत बसून एका दांडीला धागा बांधलेला तुटका चश्मा डोळ्याला लावून अण्णा लिहीत होते. जेव्हा जेव्हा मी जाई तेव्हा ते लिहीतच असत. पाचेक मिनिटं मी आतल्या एका बाजूला उभा होतो. तिथं पाणी साचलेलं छोटं डबकं होतं. चुलीजवळ साठेवहिनी गालाला हात लावून विचारमग्न बसलेल्या होत्या. त्यांच्याजवळच एक तांब्या, एकच जरमनचं ताट, एक डेचकी असा हा संसार तोंड वासून पडलेला. चुलीत अर्धी कोळसा झालेली लाकडं होती. अण्णांच्या वलानीला बऱ्यापैकी एक सदरा; लेंगा-हँगरला लोंबकळत होता. अण्णांच्या समोर एक पुतळा होता. तो गॉर्कीचाच असावा, कारण मी खूप जणांकडून ऐकलं होतं, की अण्णा गॉर्कीला गुरू मानतात, तो त्यांचा आदर्श आहे वगैरे. हे दृश्य पाहत असताना, एकाएकी मजकडे अण्णांनी पाहिलं. 'केव्हा आलात' विचारलं. 'नुकताच आलो' असं मी सांगितलं. मी चिरागनगरात गेलो नाही तर अण्णा प्रेमानं रागवत. अण्णांना माझ्याविना करमत नसे व मलाही गमत नसे. हळूहळू आमचा घरोबा वाढला.

कृती-

- लेखकाच्या जीवनातील कोणत्या प्रसंगाचे वर्णन प्रस्तुत उताऱ्यात आले आहे.
- वर्णन करा - लेखकाला अण्णांच्या प्रथमदर्शनी झालेल्या दर्शनाचे वर्णन .१).....२).....३).....
- **आकृती पूर्ण करा**



- **लेखक व अण्णा यांच्या अतूट नाते दर्शविणारी उताऱ्यातील वाक्ये.**
- **प्रस्तुत उताऱ्याच्या आधारे अण्णांच्या स्वभावविशेषाचे वर्णन तुमच्या शब्दात सोदाहरण स्पष्ट करा.**

कल्पक होऊ या


- तुमच्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंगाविषयी तुमचे मत लिहा.
- तुम्ही वाचलेल्या आत्मचरित्रात्मक पाठाचे वरील मुद्यांना अनुसरण विश्लेषण करा.

दिवस
१५ वा

चाचणी क्रमांक – १

कृती :- १. पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (७)

१. खालील कृती पूर्ण करा. (२)



२. तुलना करा. (२)

जंगली प्राणी	पाळीव प्राणी


जंगलातून फिरताना आपल्याला अनेक आवाज एकू येतात.उंच उंच गवतातून पाण्याकडे येणारे हिंस्र प्राणी पाहून पक्षी मोठ्याने आवाज करत उंच उडतात, तर शिकार होणारे प्राणी –जसे हरिण,सांबर व काळवीट मोठ्या आवाजात ओरडत धोक्याची सूचना देतात. वन्य प्राण्यांच्या पावलांचे ठसे, शिकार करण्याची पद्धत, विष्ठा व झाडाझुडपावरील त्यांच्या नख्यांच्या खुणा,त्यांचे विविध आवाज यावरून त्यांची आपल्याला ओळख होते. ही एक प्रकारची अरण्यलिपीच होय.जंगलवाचनाचा आपल्याला छंद लागला की डोळ्यांनी कानांनी नाकाने आपण प्राण्यांच्या अनेक गोष्टी जाणतो. प्राण्यांचे आवाज, पायांचे ठसे वास आपल्याला प्राण्यांच्या जगाशी एकरूप करतात.ओढा नदीकाठ माळरान डोंगरदऱ्या ओहळ झाडेझुडपे या सगळ्यांशी जवळीक निर्माण होते.कुठलेही जंगल आपल्याला कंटाळवाणे वाटत नाही कारण जंगलवाचनाचा अनुभव आपल्याला नवीनवी माहिती आणि वेगळयाच स्वरूपाचा आनंद मिळवून देतो.

३) स्वमत : (३)

जंगल भ्रमंती यावर तुमचे अनुभव कथन करा.

कृती : - २. कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (४)

१. खालील आकृती पूर्ण करा. (२)



तापीकाठची चिकणमाती ओटा तरी बांधू ग बाई
असा ओटा चांगला तर जात तरी मांडू ग बाई.
अस जात चांगल तर सोजी तरी दळू ग बाई
अशी सोजी चांगली तर लाडू तरी बांधू ग बाई
असे लाडू चांगले तर शेल्याच्या पदरी बांधू ग बाई
असा शेला चांगला तर भाऊराया भेटू ग बाई
असा भाऊ चांगला तर दरी रथ आणील ग बाई
असा रथ चांगला तर नंदी तर जुंपिन ग बाई
असा नंदी चांगला तर माहेराला जाऊ ग बाई
असं माहेर चांगले तर धिगामस्ती करू ग बाई.

२. काव्यसौंदर्य- (२)

"तापीकाठची चिकणमाती ओटा तरी बांधू ग बाई
असा ओटा चांगला तर जात तरी मांडू ग बाई." या काव्यपंक्तीतून व्यक्त होणारे विचारसौंदर्य स्पष्ट करा.

कृती : - ३ व्याकरण घटकावर आधारित कृती. (४)

१) खालील दिलेल्या ओळीतील अलंकार ओळखा. (२)

अ) बाई काय सांगो I स्वामीची ती दृष्टी I
अमृताची वृष्टी I मज होय I I

ब) आला हा दारि उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावरी सौद्याचे, देइल ज्याचे त्याला.

२) उपमेय म्हणजे काय? (१)

---

३) उपमान म्हणजे काय? (१)

दिवस
१६ /१७

क्षेत्र-
श्रवण,वाचन,
लेखन

कौशल्य - साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे. आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे. साहित्याच्या आशयावरील काढलेल्या टिपणांच्या मुद्दयांचा विस्तार करता येणे.

संकल्पना - **पद्य**

जाणून घेऊ या

खालील कवितेच्या मदतीने किंवा तुम्हांला शक्य असेल ती कविता घेऊन शिक्षकांनी पहिल्या भागात झालेल्या घटकांवर आधारित विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी. गद्य व पद्याच्या साम्य भेदाबाबत विद्यार्थ्यांना काय आकलन झाले आहे ते जाणून घ्यावे. फरक सांगू शकतात का हे जाणून घ्यावे.

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे!
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे,
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती;
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती.
खिल्लारे ही चरती रानी, गोपहि गाणी गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरे.
सुवर्णचंपक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघता भामा, रोष मनीचा मावळला!
सुंदर परडी घेउनि हाती पुरोपकंठी शुद्धमती,
सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले.पत्री खुडती-

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कवितेचे आरोह अवरोहसह कवितेचे प्रकट किंवा मौन वाचन करण्यास सांगावे. भाग क्र.१/२ मध्ये अभ्यासलेल्या कवितेतील घटकाव्यतिरिक्त कोणते वेगळे घटक या कवितेत दिसतात. त्याची गटात चर्चा करण्यास सांगावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी ही काव्याच्या अनुषंगाने येणाऱ्या घटकाविषयी विविध कृतीद्वारे काव्याची वैशिष्ट्ये तयार करण्यासाठी मार्गदर्शन करावे. अधिक दृढ होण्यासाठी सर्व घटक समावेशक अशी कविता घेऊन विद्यार्थ्यांना काव्यातील घटकांविषयी गटात चर्चा करण्यास सांगावी.

रंगरंगुल्या, सानसानुल्या, गवतफुला रे गवतफुला!
असा कसा रे मला लागला, सांग तुझा रे तुझा लळा!
मित्रासंगे माळावरती, पतंग उडवित फिरताना
तुला पाहिले गवतावरती, झुलता झुलता हसताना,
विसरून गेलो पतंग नभिचा, विसरून गेलो मित्राला
पाहुन तुजला हरखून गेलो, अशा तुझ्या रे रंगकळा!
हिरवी नाजुक रेशिम-पाती, दोन बाजूंला सळसळती
नीळनिळूली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती,
तळी पुन्हा अन् गोजिरवाणी, लाल पाकळी खुलली रे
उन्हामधे हे रंग पाहता, भान हरपुनी गेले रे!
वारा घेउन रूप सानुले, खेळ खेळतो झोपाळा
रात्रहि इवली होउन म्हणते, अंगाईचे गीत तुला,
मलाहि वाटे लहान होऊन, तुझ्याहूनही लहान रे
तुझ्यासंगती सदा रहावे, विसरूनि शाळा, घर सारे!
तुझी गोजिरी शिकून भाषा, गोष्टी तुजला सांगाव्या
तुझे शिकावे खेळ आणखी, जादू तुजला शिकवाव्या,
आभाळाशी हट्ट करावा, खाऊ खावा तुझ्यासवे
तुझे घालुनी रंगित कपडे, फूलपाखरां फसवावे

कृती :-

१) कवितेत कोणत्या शब्दांमुळे लय निर्माण झाली असे तुम्हांला वाटते.
२) कवितेत कवी कोणाशी संवाद करत आहे.
३) कवितेत निसर्गातील कोणकोणते घटक आलेले आहे.
४) कवितेत आलेली नाम आणि विशेषणे यांच्या जोड्या सांगा. जसे गोजिरा - भाषा .....
५) कवितेतील यमकाच्या जोडया सांगा.

अशा विविध कृतींचा द्वारे विद्यार्थ्यांना कवितेतील आशय समजून घेण्यास तसेच निसर्गातील घटकावर मानवतेचा आरोप करून कसे वर्णन केलेले आहे हे समजून घेण्यास मदत करावी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कविता चालीवर म्हणण्यास सांगावी, मध्यवर्ती कल्पना सांगण्यास सांगावी.


चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध कवितेच्या आधारे पुढील प्रमाणे कृती सोडविण्यास सांगाव्यात.

१)योग्य पर्याय निवडा.

- **कवीची आणि गवतफुलाची भेट झाली ते ठिकाण- अ)बागेत ब)कवीच्या घरी क)माळावर ड)शाळेत**

२)आकृतीबंध पूर्ण करा- -



३)एका शब्दात उतर द्या.

i. गवतफुलासाठी झोपाळा झालेला ----------

ii. गवत फुलाला अंगाई गीत गाऊन झोपी लावणारी--------

कल्पक होऊ या

- पाठ्यपुस्तकातील कवितेमध्ये वर्णिलेल्या निसर्ग दृश्याचे निसर्गचित्र रेखाटण्यास सांगावे
- विद्यार्थ्यांनी अनुभवलेल्या श्रावण महिन्याचे वर्णन काव्यात करण्यास प्रोस्त्साहित करा.
- विद्यार्थ्यांना वरील दोन्ही कवितेतील निवडक शब्द घेऊन ते काव्यात बांधण्याचा प्रयत्न करण्यास सांगा .

पूरक साहित्य स्तोत्र :-

इयत्ता तिसरीच्या बालभारती या पाठ्यपुस्तकातील बोलणारी नदी तसेच आम्ही कविता करतो व मधमाशीने केली कमाल या सारख्या पाठांचे वाचन करण्यास सांगावे . DIKSHA APP

दिवस
१८

क्षेत्र - लेखन:क्षमता
१ पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकावर लेखन करता येणे .

संकल्पना:-
रसविचार

जाणून घेऊ या

खालील चित्रांचे निरीक्षण करा.


दु:ख


भय


आनंद


विस्मय
(आश्चर्य)


राग


शोक


उत्साह


जुगुप्सा
(कंटाळा)

शिक्षकानी विद्यार्थ्यांना वरील मानवी चेहऱ्याचे भाव ओळखण्यास सांगून . मानवी स्थायीभाव याबद्दल चर्चा घडवून आणावी. शाब्दिक उदाहरणे विद्यार्थ्याकडून घ्यावीत.

उदा. १ गणेश आज वर्गात दु:खी दिसत होता. २ सध्या मानवामध्ये कोरानाचे भय वाढले आहे.
३ मला माझ्या मित्राला पाहून आनंद झाला. ४ वर्गात पक्षी आलेला पाहून मला आश्चर्य वाटले .

शिक्षकानी अशी विविध उदाहरणे विद्यार्थ्यांना द्यावीत. व चर्चा घडवून आणावी.

शिक्षकांनी वरील चर्चेप्रमाणे आणखी वेगळी उदाहरणे देवून मानवी स्थायीभाव व रसविचार जाणून घ्या.

१ राकेशला मुलानी चिडवल्यामुळे तो अंगावर धावून गेला.
२ दूरदेशी चाललेल्या मुलाला पाहून आईच्या डोळ्यात पाणी आले.
३ मराठी विषयाचा सोपा पेपर पाहून सर्वेशने भरभर सोडविला.
४ केतकी फार उशीरा जागी होते.
वरील वाक्यात कोणकोणते स्थायीभाव जाणवतात.

सक्षम बनू या

शिक्षकानी **रसविचार** या व्याकरण घटकाची ही संकल्पना अधिक दृढ होण्यासाठी विद्यार्थ्यांना खालील तक्ता वाचून गटात चर्चा करण्यास सांगावी.

१ आई म्हणुनी कोणी आईस हाक मारी ती हाक येई कानी मज होय शोककारी	४ कोंबडीला आला टेलिफोन तिने विचारले बोलतय कोण	७ नाकामधुनी उंट लोंबती उवा माखल्या केसात
२ डोळे हे जुलमी गडे रोखून मज पाहू नका	५ धबाबा लोटल्या धारा धबाबा तोय आदळे	८ असावा सुंदर चॉकलेटचा बंगला चॉकलेटच्या बंगल्याला ट्राफिच दार
३ शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती	६ ओढ्यात भालु ओरडती वाऱ्यात भुते बडबडती डोहात सावल्या पडती	९ आता विश्वात्मके देवे येणे वाङयज्ञे तोषावे

शिक्षकांनी वरील उदाहरणे वाचण्यास सांगावी व गटात चर्चा करावी. उदाहरणातील नऊ रसांची माहिती देऊन विविध उदाहरणे द्यावीत.

कृती : पर्यायी उत्तर शोधून लिहा

१ **रसाचे प्रकार :**

१) आठ २) सात ३) नऊ ४) पाच

२ अद्भुत रसांमध्ये पुढील स्थायीभाव असतो :

१) दु:ख २) आनंद ३) आश्चर्य ४)भीती

3 ओळखा पाहू

१ **या उदाहरणात कोणता रस आढळतो.**

खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे
चिंधड्या उडविन राई-राई एवढ्या

४ वरील तक्ता वाचून पुढील उदाहरण हे कोणत्या रसाचे आहे ते लिहा.

आता विश्वात्मके देवे
येणे वाङयज्ञे तोषावे.

सक्षम बनू या

- नऊ रसांची नावे एकाखाली एक व त्यापुढे साहित्यातील कोणतेही एक उदाहरण लिहा.
- जाईन विचारीत रानफुला
  भेटेल तिथे ग सजन मला
  हे कोणत्या रसाचे उदाहरण आहे.
- भयानक रस कसा ओळखावा ते लिहा.
- तुम्ही ऐकलेली व पाहिलेली 10 मराठी गाणी सांगा. व त्याचे रस ओळखा.

कल्पक होऊ या

- पाठ्यपुस्तकातील विविध कविता कोण-कोणत्या रसामध्ये आहेत शोध घ्या.
- कवितेप्रमाणे आणखी कोणत्या साहित्यात रस आढळतात ते लिहा.
- यूट्यूब- विकिपीडिया,यांचा वापर करून अधिक माहिती मिळवा.
- व्याकरणाच्या पुस्तकांचा वापर करा.

दिवस
१९

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य

१ दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे .

२ म्हणी,वाक्प्रचार ,सुभाषिते, कल्पना विस्तार यांचा लेखनात प्रभावी वापर करता येणे

संकल्पना:-
कथालेखन

जाणून घेऊ या

❖ खालील शीर्षकावरून कथा लेखन करा



१ वरील शीर्षकाची कथा लिहिताना तुम्ही कोणते स्थळ निवडाल ते लिहा.

२ या कथेसाठी कोणकोणती पात्रे निवडाल ते सांगा.

३ कथेचे तात्पर्य लिहा.

४ ही कथा खालील कोणत्या कथा प्रकारात मोडते ते लिहा.

१ विज्ञान कथा २ रुपक कथा ३ साहस कथा ४ बोधकथा

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट तयार करून वरील शीर्षकावरून कथेतील पात्रे, घटना व घटनाक्रम, स्थळ, सुसंगतता या विषयी गटात चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी वरील प्रकारे सोप्या प्रश्नातून विद्यार्थ्यांकडून कथेविषयी जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी कथालेखन अधिक दृढ होण्यासाठी विद्यार्थ्यांना पुढील कथेचा पूर्वार्ध वाचून कथा पूर्ण करण्यास सांगा .

रामपूर नावाचे गांव होते. तेथे सर्वजण गुण्यागोर्विंदाने रहात होते. त्या गावात किराणामालाचे एकमेव दुकान होते. दुकानदाराचे नाव भिकूशेठ होते. तो कधीच कोणाला मदत करीत नसे किंवा उधार साहित्य देत नसे. गोरगरीब त्यांना दयेची भीक घालीत; पण त्याला कोणाचीही दया येत नसे. गावातील लोक त्याच्या वृत्तीला कंटाळले होते. अचानक एकदा दुकानातून आगीचे लोट येऊ लागले.
आणि दुकानदार.. .. .. ..

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील अपूर्ण कथा वाचायला सांगा. वरील अपूर्ण कथा पूर्ण करण्यास सांगा. (कथेचा उत्तरार्ध लिहा.) पुढील कृतींच्या मदतीने कथा लेखनाची वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

१)कथेचा काळ ----------

२)कथेतील पात्र ----------

३)कथेचे तात्पर्य ----------

४)कथेतील घटना----------

५) कथेचे शीर्षक ----------

चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील शब्दावरून कथा लिहिण्यास सांगावी व योग्य शीर्षक देऊन तात्पर्य व म्हण ओळखण्यास सांगावी. कथेत योग्य पात्रे निवडून उचित संवाद लिहिण्यास सांगा.

विद्यार्थी – शाळा – पराक्रम—सत्कार

शिक्षकांनी अशा प्रकारची विविध उदाहरणे देवून कथा या घटकाचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या

- शीर्षकावरून कथा लिहा. उदा . धाडसी बाळू
- कथा बीजावरून कथा लिहा – अखेर चोर सापडला
- अपूर्ण कथा पूर्ण करा. (पूर्वार्ध अथवा उत्तरार्ध देवून)

वरील प्रमाणे कथालेखनाच्या विविध कृती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्याव्या .

❖ **पूरक साहित्य स्रोत**

दीक्षा ॲप

क्यू. आर. कोड इ.

दिवस
२०/२१

क्षेत्र – श्रवण
वाचन /लेखन

कौशल्य / संकल्पना:-

विविध साहित्यप्रकाराचे समजपूर्वक वाचन करणे,मूल्यमापन करणे,चिकित्सक विचार करून स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे./
संकल्पना- ललित साहित्य – चरित्र

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांना आदर्शवत असलेल्या (सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक राजकीय क्षेत्रातील)कोणत्याही व्यक्तीबद्दल बोलण्यास सांगावे व तुम्ही सांगितलेल्या माहितीत पुढील घटक आले का?याची चर्चा गटात करा असे सांगावे. (कर्तृत्वान व्यक्ती,तिचा परिचय,तिच्या आयुष्यातील एखादा प्रसंग/घटना,त्यातून तुम्हाला भावलेले त्यांचे वेगळेपण,त्यांच्यात दिसून आलेले विशेष गुण)

राधिका या केरळच्या कोदुनगलर भागात लहानाच्या मोठ्या झाल्या. धाडस आणि काहीतरी करून दाखवण्याची हिंमत हे त्यांचे गुणविशेष होत. मोकळ्या वेळेत त्यांचं नेहमी सागरकिनारी भटकणं , फिरणं व्हायचं. त्यामुळे उसळणाऱ्या नखरेल लाटांना पाहून त्यांच्या सोबतीनं अनंत अशा सागरसफरीला जावं, असं त्यांच्या मनाला वाटायचं. या लाटांना पाहूनच त्यांनी नौसेनेत जायचं निश्चित केलं. सुरुवातीला त्यांच्या आई-वडिलांनी, त्यांच्या या निर्धाराला विरोध केला. त्यांना वाटलं होतं, की ही जोखमीची नोकरी आहे. आपली नाजूक मुलगी समुद्रातल्या धोक्यांचा सामना कसा करेल? पण उत्तुंग इच्छा शक्ती असलेल्या राधिकाने त्यांना यासाठी राजी केलं. समुद्री जहाजाची कमान सांभाळायची. त्यांचे हे स्वप्न २०१२ साली पूर्ण झालं. राधिका देशातल्या पहिल्या महिला मर्चंट नेव्ही कॅप्टन बनल्या. दरम्यान त्यांचा विवाह नेव्ही मधील एका रेडिओ ऑफिसरशी झाला. एकाच व्यवसायात असल्या कारणानं नवऱ्याला त्यांच्या जबाबदारीची माहिती होतीच. आई बनल्यावर अडचणी वाढल्या. कौटुंबिक आणि नोकरीची जबाबदारी सांभाळताना अनेक अडचणी आल्या; परंतु त्या अजिबात डगमगल्या नाहीत. सगळ्यांत कठीण गोष्ट होती, ती म्हणजे मुलाचा सांभाळ. दीर्घकाळ घरापासून लांब रहावं लागायचं. राधिकांनी हे आव्हानदेखील चांगल्या प्रकारे निभावलं. राधिकाच्या या रोमांचकारी प्रवासात घरच्यांनी मोठी साथ दिली.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उताऱ्याचे मूक अथवा गटात प्रकटवाचन करण्यास सांगावे व पुढील कृतींच्या मदतीने त्यांनी सांगितलेल्या माहितीशी तुलना करण्यास सांगावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी आत्मचरित्रात्मक लेखाच्या दृढी करणासाठी वरील उताऱ्यासारखे उतारे घेऊन विद्यार्थ्यांना चरित्रात्मक लेखात येणाऱ्या पुढील घटकां लक्षात घेऊन सबंधित उताऱ्याची किंवा पाठाची गटात चर्चा करण्यास सांगावी.

१
- चरित्रात केंद्रस्थानी असेलेली व्यक्ती.
- चरित्रात वर्णन केलेल्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीला पूरक ठरलेल्या गोष्टी.

२
- चरित्रात वर्णन केलेल्या व्यक्तीच्या जीवनात आलेले प्रसंग.
- संबंधित काळातील वातावरणाचे केलेले वर्णन.

३
- चरित्रात वर्णन केलेल्या व्यक्तीचे गुण विशेष
- वर्णन केलेल्या चरित्रातून दिसून येणारी मुल्ये.

चला सराव करू या


मुळगावकर यांना त्यांच्या पत्नी श्रीमती लीलाबाई यांची उत्तम साथ होती आणि लीलाबाईंच्या सामाजिक सेवेच्या कामात मुळगावकर सहभागी असत. कोयना भूकंप असो वा दुष्काळ, अशा वेळी लीलाबाई जीव तोडून काम करत, त्यास मुळगावकर यांची साथ होती. टेल्कोच्या कारखान्याच्या परिसरातील काही खेड्यांत शेतीसुधारणा, शिक्षण, आरोग्य या संबंधांत गाजावाजा न होता काही वर्षे काम चालू आहे. यामागे मुळगावकर यांची प्रेरणा होती. एक काळ शिकारी असलेल्या मुळगावकरांनी शि कार सोडली आणि कॅमेरा स्वीकारला. छायाचित्रण हा त्यांचा छंद होता आणि त्यांनी काढलेल्या उत्कृष्ट छायाचित्रांचे प्रदर्शनही होऊ शकते. त्यांचा दुसरा छंद झाडे लावण्या चा. पुण्यात कारखाना स्थापन करतानाच त्यांनी लाखएक झाडे लावली आणि यामुळे आज हा परिसर नयनमनोहर झाला आहे. एवढी झाडी असल्यामुळे असंख्य पक्षी येत असतात. टेल्को ने एक वृक्षपेढी स्थापन केली आहे. त्यामधून लाखांवर झाडे वाटली गेली. मुळगावकर यांची ही सामाजिक दृष्टी वाखाणण्यासारखी होती. एक चिनी म्हण अशी आहे, की तुम्हां ला तीस वर्षांची योजना आखायची असेल, तर झाडे लावा आणि शंभर वर्षांची योजना करायची असेल, तर माणसे तयार करा. मुळगावकरांनी हे दोन्ही केले. मुळगावकरांचे जीवन

समाधानी व कृतार्थ होते.

१)मुळगावकर यांचा आदर्शवाद →

२)मुळगावकर यांची सामाजिक दृष्टी

२)आकृती पूर्ण करा.



३) एका शब्दात उत्तर द्या .मुळगावकर यांचा छंद. .....

- **स्वमत - तुमच्या साठी आदर्श (आवडत्या)असलेल्या व्यक्तीचे स्वभावविशेष सोदाहरण स्पष्ट करा.**

शिक्षकांनी वरील कृतीप्रमाणे इतर कृती देऊन आशयाचे आकलन करून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

कल्पक होऊ या

कल्पक होऊया (आव्हाने):-

- तुम्ही वाचलेल्या कोणत्याही चरित्राचे सक्षम बनू या मधील मुद्द्यांना अनुसरण माहिती लिहा.
- तुमच्या परिसरात असणाऱ्या लघुउद्योजकाची मुलाखत घ्या.

दिवस
२२ /२३

क्षेत्र-
श्रवण,वाचन,
लेखन

कौशल्य- साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे. आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे. साहित्याच्या आशयावरील काढलेल्या टिपणांच्या मुद्दयांचा विस्तार करता येणे.

संकल्पना:-पद्य

पद्य

जाणून घेऊ या

खालील कवितेच्या मदतीने किंवा तुम्हांला शक्य असेल ती कविता घेऊन शिक्षकांनी पहिल्या भागात झालेल्या घटकांवर आधारित विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी.गद्य व पद्याच्या साम्य भेदाबाबत विद्यार्थ्यांना काय आकलन झाले आहे ते जाणून घ्यावे. फरक सांगू शकतात का हे जाणून घ्यावे.

विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व ह्या जगामाजीं;
न दिसे एकहि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी.॥१॥
देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे
ऐसें एकच विद्या-धन, अद्भुत गुण न हा दुज्यांत वसे. ॥२॥
नानाविध रत्नांची, कनकांचीं असति भूषणें फार;
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. ॥३॥
या साऱ्या भुवनीं हित-कर विद्येसारखा सखा नाहीं;
अनुकूळ ती जयाला नित्य तयाला उणें नसे कांही. ॥४॥
गुरुपरि उपदेश करी, संकट-समयीं उपाय ही सुचवी,
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथां पुरवी. ॥५॥
या परि सकल सुखें जी देई, दु:खें समस्त जी वारी,
त्या विद्यादेवीतें अनन्यभावें सदा भजा भारी. ॥६॥

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कवितेचे आरोह अवरोहसह कवितेचे प्रकट किंवा मौन वाचन करण्यास सांगावे.तसेच वरील कवितेत आलेला विषय,कवितेतून मिळणारा संदेश,कवितेत आलेला अलंकार,असे विविध प्रश्न विचारून कवितेला सौंदर्य प्राप्त होण्यासाठी कवितेतील घटक समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कवितेच्या मदतीने किंवा आवश्यक असल्यास दुसरी कोणतीही कविता घेऊन संकल्पना अधिक दृढ होण्यासाठी पुढील कृतींच्या मदतीने काव्यसौंदर्यत येणाऱ्या इतर घटकांना घटकाबाबत चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी.


- **वरील कवितेत आलेल्या पुढील शब्दांचा वापर करून वाक्य तयार करा.**
  असाध्य, उणें, अद्भूत, कनक, भूषणे, भुवनी, कल्पतरू, मनोरथ, सकल, अन्यनभावे, समस्त.
- **वरील कवितेत कोणकोणत्या काव्यपंक्तीत उपमा अलंकार आलेला आहे ते सांगा.**
- **काव्यपंक्तीत उपमा अलंकार आहे , ते उपमेय व उपमान सांगून स्पष्ट करा.**
- **वरील कवितेत काही सामासिक ,अलंकारिक शब्द आलेले आहेत,की ज्यामुळे कवितेला सौंदर्य प्राप्त झाले आहे.ते ओळखून सांगा.**
- **कवितेत यमक साधलेल्या शब्दांच्या जोड्या सांगा.**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कृतींच्या मदतीने कवितेची मध्यवर्ती कल्पना सांगण्यास सांगावी व कवितेचा आशय समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

चला सराव करू या

१) **कोण ते सांगा ? जगात माणसाला श्रेष्ठत्व प्राप्त झाले तो घटक.**

२) **विद्येची ज्या घटकांशी तुलना केली ते सांगून पुढील आकृती पूर्ण करा.**



३) ओळखा पाहू- विद्येतील अद्भुत गुण

१)..... २).....

कल्पक होऊ या

- विद्या धनं सर्व धनम प्रधानम या सुभाषिताचा विविध उदा.द्वारे स्पष्ट करा.

पूरक साहित्य स्तोत्र :-

दिक्षा ॲप

क्यू. आर. कोड

दिवस
२४

क्षेत्र - लेखन:क्षमता

लेखन करताना समास या व्याकरण घटकाचा वापर करता येणे.

संकल्पना:-

समास

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. गट तयार करून गटात चर्चा करण्यास सांगावी.

- **वडापाव** –वडा घालून तयार केलेला पाव. 
- **पोळपाट** – पोळी करण्यासाठी लागणारा पाट 
- **कांदेपोहे** – कांदे घालून तयार केलेले पोहे. 
- **पंचवटी** – पाच(वटांचा) वडांचा समूह 

शिक्षकांनी अशा विविध उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी. सामासिक शब्द, शब्दांचा विग्रह सांगतात का हे जाणून घ्यावे.
जसे पुढील उदाहरणे पाहा.

- **खडीसाखर** – खडयासारखी साखर
- **महादेव** – महान असा देव
- **बहीणभाऊ** – बहीण आणि भाऊ
- **चहापाणी** – चहा, पाणी व फराळाचे इतर पदार्थ

वरील सामासिक शब्दांचा विग्रह करा.

१ ----------२----------

३----------४ ----------

शिक्षकानी वरील चर्चेप्रमाणे विविध उदाहरणे देऊन समास , सामासिक शब्द व शब्दांचा विग्रह या संकल्पना विद्यार्थ्यांकडून जाणून घ्याव्यात.

सक्षम बनू या

शाळेला सुट्टी लागली. दररोज मुले मैदानावर जाऊ लागली. आठवडा झाले मुले विटीदांडू हा एकच खेळ खेळत होती. सर्व मुलांमध्ये महादेव हा उत्तम खेळ खेळत असे. आज त्याने पांढराशुभ्र ड्रेस घातला होता. तो त्याला शोभून दिसत होता. क्रीडांगणावर अनेक मुले-मुली विविध खेळ खेळत असत.मैदानावर अनेक वडिलधारी माणसे गप्पागोष्टी करीत बसलेली असत. खेळताना मुलांच्यात खेळावरून भांडणे होत असत. मग ही मुले खरे-खोटे करण्यासाठी मैदानातील वडिलधाऱ्या व्यक्तीकडे जात असत. ते भेदाभेद न करता योग्य बाजू मांडत होते.

शिक्षकांनी वरील उताऱ्याच्या मदतीने समास,सामासिक शब्द व शब्दांचा विग्रह या विषयी चर्चा करून समास या घटकाची ओळख करून द्यावी.

वरील उताऱ्यातील समासाचे खालील तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.

सामासिक शब्द	विग्रह	समासाचे नाव

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने कर्मधारय समास, द्विगू समास,इतरेत्तर द्वंद्व समास, वैकल्पिक द्वंद्व समास व समाहार द्वंद्व समास या विषयी चर्चा करून समास ही संकल्पना समजून द्यावी.

चला सराव करू या

खालील उदाहरणांमधील सामासिक शब्द ओळखा.

१ सत्यमार्ग कधीही सोडू नये .

२ आकाशात सप्तरंगाची उधळण झाली होती

३ दिवसरात्र पाऊस पडत होता.

४ महामारीने अनेक बरेवाईट अनुभव आले.

५ गावोगावी फिरून तो कपडालत्ता विकत असे.

शिक्षकांनी वरील उदाहरणातील सामासिक शब्द व समासाचे प्रकार ओळखण्यास सांगून अधिक उदाहरणांचा सराव करून घ्यावा .

कल्पक होऊ या

- समासाच्या प्रकारानुसार सामासिक शब्दांचा पाठ्यपुस्तकात शोध घ्या.
- आंतर जालाचा वापर करून समास या घटकाची अधिक माहिती मिळवा.
- पाठ्यपुस्तकातील सामासिक शब्दांची यादी करा. शब्दांचे समसांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करा.

दिवस

२५

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य

१ दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे .

२ म्हणी,वाक्प्रचार ,सुभाषिते, कल्पना विस्तार यांचा लेखनात प्रभावी वापर करता येणे

संकल्पना:-

कथालेखन

जाणून घेऊ या

---------- अखेर सहलीचा दिवस उजाडला. सहल एका नदीच्या काठावर थांबली होती.

सर्व मुले –मुली खूप आनंदात होती. शिक्षकांनी सर्वाना गाडीत बसण्याच्या सूचना दिल्या. काही मुले नदीच्या पुलावर थांबली होती. सेल्फी घेण्यात गुंग झाली होती. आणि अचानक सेल्फीच्या नादात अतुल नावाचा मुलगा तोल जाऊन तो नदीत पडला. मुले आरडाओरडा करू लागली. तेवढ्यात शाळेतील शिक्षक आर. एस . पाटील सरांनी अचानक पाण्यात उडी घेतली. अतुलची कॉलर पकडली. त्याला अलगद उचलून घेऊन काठावर आले. त्याच्या नाका तोंडात पाणी गेले होते. तो बेशुद्ध पडला होता. त्याच्यावर प्राथमिक उपचार केल्यावर शुद्धीवर आला. सर्वाना हायसे वाटले. धोका टळला होता. अतुलला वाचवणाऱ्या पाटील सरांचे सर्वांनी कौतुक केले. त्यांच्या धाडसाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. स्वत:चे प्राण धोक्यात घालून दुसऱ्याचे प्राण वाचविण्याचा आदर्श पाटील सरांनी आपल्या कृतीद्वारे मुलांसमोर ठेवला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील अपूर्ण कथेचा पूर्वार्ध लिहायला सांगून कथा पूर्ण करायला सांगावी. वरील कथेतील पात्रे, घटना व घटनाक्रम, स्थळ, सुसंगतता या विषयी गटात चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी वरील प्रकारे सोप्या प्रश्नातून विद्यार्थ्यांकडून कथेविषयी जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी कथालेखन अधिक दृढ होण्यासाठी पुढील कथेच्या शीर्षकावरून कथा लिहिण्यास सांगावी.

एकीचे बळ

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील शीर्षकावरून कथा लिहायला सांगावी व पुढील कृतींच्या मदतीने कथा लेखनाची वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

१)कथेची सुरुवात ----------(आकर्षक उत्कंठा वाढविणारी)

२)कथेतील पात्र ---------- (कथेनुसार पूरक असणारी)

४)कथेतील घटना---------- (सुसंगत घटना)

५) कथेचे तात्पर्य ----------(बोध देणारे, शिकवण देणारे)

शिक्षकांनी खालील नमुना उदाहरण वाचायला सांगून त्यानुसार संवाद तयार करा. गटात कथेत येणाऱ्या पात्राविषयी चर्चा करा. पात्रांच्या तोंडून येणारे संवाद कसे येतील. या विषयी मार्गदर्शन करा.

उदा. - राग आला तर.. त्याचा चेहरा लालबुंद झाला होता.

तसे.

आनंद झाला तर..

दु:ख झाले तर..

उत्साह वाटला तर..

खूप खुश झाला तर..

चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कथेचे मुद्दे वाचून त्यावर आधारित कथा लिहिण्यास सांगावी.



शिक्षकांनी अशा प्रकारची विविध उदाहरणे देवून कथा या घटकाचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या

१ शीर्षकावरून कथा लिहा. उदा .करावे तसे भरावे

२ कथा बीजावरून कथा लिहा – अखेर भेट झाली.

३ अपूर्ण कथा पूर्ण करा. (पूर्वार्ध अथवा उत्तरार्ध देवून)

वरील प्रमाणे कथालेखनाच्या विविध कृती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्याव्या .

५. पूरक साहित्य स्रोत

पाठ्यपुस्तकातील कथा

दीक्षा ॲप

दिवस
२६/२७

क्षेत्र – श्रवण
वाचन /लेखन

कौशल्य / संकल्पना:-

विविध साहित्यप्रकाराचे समजपूर्वक वाचन करणे,मूल्यमापन करणे,चिकित्सक विचार करून स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे./

संकल्पना- ललित साहित्य – ललित निबंध

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आता पर्यंत अभ्यासलेल्या ललित साहित्य अंतर्गत अनुभव कथन,आत्मचरित्र,चरित्र या साहित्यप्रकारचे दृढीकरण होण्यासाठी त्यातील साम्य असलेल्या वैशिष्ट्यांचे गटात तुलनात्मक चर्चा करण्यास सांगावे. ललित साहित्यात या प्रकारापैकी नववीत अभ्यासलेल्या इंग्लडचा हिवाळा आणि दुपार या पाठाचे मूक वाचन करण्यास सांगावे व काय वेगळेपण आहे त्याची चर्चा करण्यास सांगावे.

सकाळच्या उल्हासानंतर अन् प्रसन्नतेनंतर सूर्याच्या तेजाने तळपत असते पृथ्वी...ण पृथ्वीवरील माणसे, प्राणी, पशू, पक्षी, झाडे, वेली. सूर्य दिवसाच्या मध्यान्हावर आलेला असतो आणि सुरू होते या विश्वाची, या जगाची दुपार. त्या प्रखर सूर्याच्या तेजाने तेजाळून जातो सगळा आसमंत. 'माझ्या कडे डोळे वटारून पाहिलंस तर डोळे जाळून टाकीन', असं त्या सूर्याचं रौद्र रूप,सूर्यनारायणाकडे न बघताही दिसतं दुपारीच. आपल्या कर्तृत्वानं त्यानं दीपवून टाकलेलं असतं पृथ्वीला-इतकं, की त्याच्या कडे पाहण्याची सुद्धा हिंमत होऊ नये. मधल्या सुट्टीत वर्गातून आरडत-ओरडत धूम ठोकणाऱ्या पोरांना कोण आनंद झालेला असतो, या छोट्याशा सुटीचा अन् आईनं काय डब्या त दि लंय याची उत्सुकता तर आता अगदी शिगेला पोहोचलेली असते. नेमका आज त्यांचा आवडता डबा असतो अन् तो पटापट खाऊन, हात धुवून वर्ग सुरू व्हायच्या राहिलेल्या थोड्या वेळात त्यांनी थोडा खेळ आणि मस्ती ही केलेली असते. दुपार मोठ्या गमतीनं रोज-रोज ही शाळेतल्या मधल्या सुट्टीचा आनंद घेत असते. अशी ही दुपार होत असते एखाद्या शेतावर. त्या तळपत्या सूर्याला साक्षी ठेवून सकाळपासून केलेल्या कामाचा शिणवटा घालवण्यासाठी प्रशस्त अशा वडाच्या नाही तर पिंपळाच्या झाडाच्या सावलीत विसावलेला असतो कोणी शेतकरी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उताऱ्याचे मूक अथवा गटात प्रकटवाचन करण्यास सांगावे व भाग १ ते ३ मधील लेखातील तुलना करता काय वेगळेपण आहे ते पुढील कृतीव्वारे समजून घेण्यास मार्गदर्शन करावे.

कृती- **प्रस्तुत उताऱ्यात वर्णन केलेला घटक-**

- **वर्णन केलेला घटक : मानव आहे की मानवेतर आहे.**
- **वर्णिलेल्या घटकाचे कर्तुत्वान व्यक्तीसारखी गुणविशेष .१).....२).....३).....**
- **वर्णन केलेला घटकाचे मानवी जीवनावर होणारा परिणाम .....**
- **उताऱ्यात प्रस्तुत घटकाचे वर्णन करण्यासाठी वापरलेले अलंकारिक शब्द .....**

सक्षम बनू या

शिक्षकांनी ललित निबंध या लेखाच्या दृढी करणासाठी वरील उताऱ्यासारखे उतारे घेऊन विद्यार्थ्यांना ललित निबंध या लेखात येणाऱ्या पुढील घटकां लक्षात घेऊन सबंधित उताऱ्याची किंवा पाठाची गटात चर्चा करण्यास सांगावी.

१
- ललित निबंधात केंद्रस्थानी असेलेला घटक .
- वर्णन केलेल्या घटकात दिसून येणारे मानवी स्वभाव विशेष.

२
- वर्णन केलेल्या घटक आणि मानवी जीवन यांचा परस्पर संबंध.
- वर्णनातील संबंधित वेळ,काळ किंवा ठिकाण दर्शविणारे मुद्दे.

३
- वर्णन केलेल्या घटकातून दिसून येणारी मुल्ये.


चला सराव करू या

लंडनचे धुके म्हणजे औरच असते. आधी वर्षाचे दहा दिवस सुद्धा आकाश निरभ्र नसते. तिकडचे आकाश आपल्या आकाशाइतके उंच कधी वाटतच नाही. कधीही वरती पहा, काळसर पांढुरके छत जसे सर्व शहरावर घातलेले असते. कोळशावर चालणारे लंडनमधले हजारो लहान-मोठे कारखाने व कोळशावर चालणाऱ्या लंडनच्या घरांतील लक्षावधी चुली रात्रंदिवस वातावरणात धूर ओकत असतात. घरांतही जरी अनवाणी चालले तरी पाय काळे होतात. कुठल्या ही झाडाला हात लावला तरी हात काळे होतात. या धुरकट वातावरणात धुके पसरले, म्हणजे एरवी डोळ्यांना न दिसणारे कोळशाचे कण जणू दृश्य होतात. काळोख डोळ्याला दिसतो व हातांत धरता येतो. असे धुके वर्षातून एक-दोनदा तरी लंडनवर पसरते. पृथ्वीच्या भोवती हवेचे आवरण आहे व आपण त्या हवेच्या तळाशी आहोत या गोष्टी भूगोलाच्या पुस्तकात वाचल्या होत्या; पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव लंडनच्या धुक्यात आला. समुद्राच्या तळाशी असलेल्या जीवांना काय वाटत असेल त्याची कल्पना येते. या धुक्याने हाहाकार होतो.ब्रिटिश खाडीत बोटीवर बोटी आपटतात. रस्त्यावर गाड्यांचे अपघात होतात. मुले रस्ता चुकतात.हिवाळ्यातले कित्येक आठवडे येथला दिवस संधिप्रकाशा इतपत उजेडाचा असतो.

कृती-

१) वैशिष्ट्ये लिहा –

२)शब्दात उत्तर लिहा –लंडनमधील वातावरणात धूर ओकणारे घटक . १).....२).....



३)परिणाम लिहा – लंडन मधील धुक्याचा मानवी जीवनावरील परिणाम.

१)

२)

३)

४)

स्वमत – तुम्ही अनुभवलेल्या हिवाळ्यातील एका दिवसाचे [illegible] करा.

शिक्षकांनी वरील कृतीप्रमाणे इतर कृती देऊन आशयाचे आकलन करून घेण्यासाठी मार्गदर्शन करावे.

कल्पक होऊ या

- धुक्यात बुडालेला तुमचा गाव किंवा तुमचे शहर याविषयी तुमच्या मनात आलेले विचार व्यक्त करा.
- मे महिन्यातील दुपार तुम्ही कशी घालवता याविषयी सविस्तर लिहा.

दिवस
२८/२९

क्षेत्र-
श्रवण,वाचन,
लेखन

कौशल्य- साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे. आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे. साहित्याच्याआशयावरील काढलेल्या टिपणांच्या मुद्दयांचा विस्तार करत **संकल्पना:-** पद्य / पद्य

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कवितेचे प्रकट वाचन करण्यास सांगावे.तसेच या कवितेच्या मदतीने किंवा तुम्हांला शक्य असेल ती कविता घेऊन शिक्षकांनी पहिल्या भागात झालेल्या घटकांवर आधारित विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.यमक,उपमा,रूपक,उत्प्रेक्षा, चेतनगुणोक्ती अलंकार. कवितेचे सौंदर्य निर्माण होण्यासाठी कवीने केलेली शब्दाची अचूक निवड.शब्दांचे अर्थ अशा विविध प्रश्नांच्या द्वारे या घटकांचे आकलन झाले की नाही ते जाणून घ्यावे.

बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.॥१॥
याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.॥२॥
नाही एकहि हुंदका
मुखावाटे काढणार
मीच लावुनि ठेविली
तुझ्या तलवारीला धार.॥५॥
तुझ्या शस्त्रांना,अस्त्रांना
शक्ति देईल भवानी,
शिवरायाचे स्वरूप
आठवावे रणांगणी ॥७॥

याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.॥२॥
म्हणूनि या माझ्या डोळा
नाही थेंबही दु:खाचा;
मीहि महाराष्ट्रकन्या
धर्म जाणते वीराचा.॥४॥
अशुभाची साउलीहि
नाही पडणार येथे;
अरे मीहि सांगते ना
जिजा-लक्षुमींशी नाते.॥६॥
धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन!॥८॥

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील कवितेचे आरोह अवरोहसह कवितेचे प्रकट किंवा मौन वाचन करण्यास सांगावे. विषय, अलंकार,विविध प्रतिमा,अलंकारिक शब्द,या घटकाबरोबरच काव्याचे सर्वात महत्त्वाचा विशेष म्हणजे रस, रस हा काव्याचा आत्मा असतो.वरील कवितेत आलेल्या रसाविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कवितेच्या आधारे काव्यात नाद,लय,अलंकार,प्रतिमा,आशयाला अनुसरून शब्दांची निवड,त्यांची योग्य मांडणी,रस,वृत्त, हे घटक येतातच परंतु कवी कोणतीही बंधन न मानता आपल्या मनातील विचार व्यक्त करतो.हाही एक रचनाप्रकार आहे.त्याला मुक्तछंद म्हणतात.तो कसा ते विद्यार्थ्यांशी चर्चा करून किंवा गटात चर्चा करायला सांगून समजून घेण्यास मदत करावी.

हाकेतून हद्दपार होतेय आई
हरवत चाललाय किराणा आणि भुसार
लोहाराचा भाता आणि कुंभाराचा आवा
कल्हईची झिलई विस्तवासोबत निघून गेली.
राखेसहित दुरावत गेली गॅसच्या शेगडीवर
सुटीत आता खेळत नाहीत मुलं
थांबून गेलाय त्यांचा दंगा,
परकऱ्या मुली खेळत नाहीत आता
पोरं आता दंग असतात दूरदर्शनच्या चॅनेलवर
आणि उलगडत क्राइम-थ्रिलर.
शब्द बापुडे केवळ वारा तसे विरून जातायत
आणि माझी बोली


हंबरायच्या थांबल्यायत गोठ्यातल्या गाई
सुपर मार्केटच्या झगमगाटात झरझर
निघून चाललाय गावगाड्यासोबत मुकाट
मागच्या धगीवर रटरटणारी आमटी
बोलाचालीतून निघून चाललीय माझ्या आईची बोली
विटीदांडू आणि लगोऱ्या
आट्यापाट्या आणि पिंगा
आधीचे मातीतले खेळ
बघत क्रिकेटची मॅच
लिहिते हात आता राहिले नाहीत लिहिते,
मी वाचवतोय माझी कविता आणि माझी आई
आणि माझी भूमी कवितेसोबत

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कविता चालीवर म्हणण्यास सांगावी, मध्यवर्ती कल्पना सांगण्यास सांगावी व पुढील कृतींच्या मदतीने मुक्तछंदात्मक काव्याची वैशिष्ट्ये समजावून द्यावीत

चला सराव करू या

कृती :-

१)आकृतिबंध पूर्ण करा



२) कवीला खंत वाटते त्या गोष्टी. १).....२).....३).....४).....

३) कवितेत आलेले ग्रामीण जीवनातील गोष्टी. ....., ..., ...

कल्पक होऊ या


- कवीने वर्णन केल्याप्रमाणे तुम्हालाही अशा काही गोष्टींची खंत वाटत का ?कवीप्रमाणे काव्यातून व्यक्त होण्याचा प्रयत्न करा.

दिवस
३०


चाचणी क्रमांक – २

कृती :- १. कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (६)

३. खालील कृती पूर्ण करा. (२)



४. आकृती पूर्ण करा. (२)



श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे!
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे,
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती;
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती.
खिल्लारे ही चरती रानी, गोपहि गाणी गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरे.
सुवर्णचंपक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघता भामा, रोष मनीचा मावळला!
सुंदर परडी घेउनि हाती पुरोपकंठी शुद्धमती,
सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले.पत्री खुडती-
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात,

३) **खालील ओळीचा सरळ अर्थ लिहा.** (२)

"श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे".

कृती : - २ व्याकरण घटकावर आधारित कृती. (४)

४ पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा. (२)

सामासिक शब्द	विग्रह	समासाचे नाव
महादेव		
आठवडा		

५ पुढील उदाहरणे हे कोणत्या रसाचे आहे ते लिहा. (२)

अ. सहज सख्या एकदाच येई सांजवेळी.

आ. उठा राष्ट्र वीर हो, सज्ज व्हा उठा चला.

इ. हे कोण बोलले बोला, राजहंस माझा निजला.

ई. घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला.

कृती :- ३ खालील पैकी कोणतीही एक कृती सोडवा. (५)

१) खालील शीर्षकावरून कथा लिहा.

"अतिशहाणा त्याचा बैल रिकामा"

किंवा

२) **खालील विषयावर बातमी तयार करा.**

जनता गर्ल्स् हायस्कूल, शेंदुरजना घाट मध्ये जागतिक महिला दिन

मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला.

दिवस
३१

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य

१ म्हणी,वाक्प्रचार ,सुभाषिते, कल्पना विस्तार यांचा लेखनात प्रभावी वापर करता येणे

संकल्पना:-

वाक्प्रचार

जाणून घेऊ या

खांद्याला खांदा लावणे

१) प्रत्यक्षात आपला खांदा दुसऱ्याच्या खांद्याला लावणे

२) सहकार्य करणे

डोळे उघडणे

१) झोप पूर्ण झाल्यावर डोळे उघडणे

२)आपली चूक समजून येणे

माशा मारणे

१) प्रत्यक्षात माशी या किटकाला मारणे

२) वेळ फुकट घालवणे

डोळ्यातील पाणी पुसणे

१) डोळ्यातील अश्रू पुसणे

२) दु:ख कमी करणे

शिक्षकांनी अशा विविध उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी. शब्दश: होणारा अर्थ व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेला शब्द समूह हा फरक जाणून घ्यावा. अधिक माहिती जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून पुढील उदाहरणे सोडवावी.

१) **आग लावणे** याचे दोन अर्थ सांगा.

१ ----------२----------

२) **उकळी फुटणे** याचे दोन अर्थ सांगा.

१ ----------२----------

शिक्षकानी वरील चर्चेप्रमाणे विविध उदाहरणे देऊन **वाच्यार्थ** व **लक्ष्यार्थ** सांगून **वाक्प्रचाराबद्दल माहिती** विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावी.

सक्षम बनू या

१ महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.
२ लाडकी लेक सासरी जाताना बाबांचे डोळे भरून आले.
३ शाहू महाराजांनी लोक कलावंतांच्या गुणांची कदर केली.
४ वर्गात सहलीची नोटीस आल्यावर मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला.
५ क्रिकेटचा सामना रंगात आला होता.
६ सीमेवर सैनिक पहारा देत असतात.
७ बाबा बातम्या कान देवून ऐकू लागले.

शिक्षकांनी वरील वाक्यांच्या मदतीने वाच्यार्थ व लक्ष्यार्थ या विषयी चर्चा करून वाक्प्रचार या घटकाची ओळख करून द्यावी.

खालील तक्ता पूर्ण करा.

वाक्प्रचार	अर्थ	वाक्यात उपयोग
१ भान असणे		
२ आभाळ फाटणे		
३ दाद देणे		
४ साद घालणे		

शिक्षकांनी वरीलप्रमाणे अधिक उदाहरणाच्या मदतीने वाक्प्रचाराचा फायदा,दैनदीन जीवनात वाक्प्रचारचे महत्व हे विद्यार्थ्यांना समजून द्यावे.

चला सराव करू या

शिक्षकांनी खालील उदाहरणाप्रमाणे वाक्प्रचार अधिक उदाहरणे घेऊन ती ओळखण्यास सांगा.

१ सुट्टीची नोटीस मुले कान देवून ऐकत होती.

२ आईवडिल मुलांसाठी खूप खस्ता खातात.

३ मांजराच्या पिल्लाला आमचा लळा लागला होता.

४ सैनिकांनी शत्रूला कंठस्नान घातले.

५ आजीचा सर्व मुलांना सारख्याप्रमाणात दूध मिळेल याकडे कटाक्ष होता.

कल्पक होऊ या

- पाठ्यपुस्तकातील विविध पाठातून आलेल्या वाक्प्रचाराचा शोध घेण्यास सांगा.
- आंतरजालाचा वापर करून वाक्प्रचार या घटकाची अधिक माहिती मिळविण्यास सांगा.
- पाठ्यपुस्तकातील वाक्प्रचाराची यादी करण्यास सांगून एका वाक्प्रचाराची दोन उदाहरणे देण्यास सांगा.

दिवस

३२

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य

१ घटना प्रसंग स्वानुनुभव यांचे लेखन करता येणे

संकल्पना -

बातमी लेखन

जाणून घेऊ या

व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धापरीक्षा ऑनलाईन कार्यशाळा

कान्होजीबाबा आयोजन समितीचा नाविण्यपुर्ण उपक्रम




प्रतिनिधी/ ८ जून

अमरावती- आयोजन अशोक शिक्षण संस्था अशोकनगर द्वारा संचालित श्री कान्होजीबाबा कनिष्ठ महाविद्यालय अंजनसिगी द्वारा आयोजित व्यक्तिमत्त्व विकास व स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन प्राचार्य भाऊराव गाढवे यांनी केले.दिनांक 16/5/2021 पासून सलग एकविस दिवस 31 मे पर्यंत व्हीडिओ द्वारा व 1 जुन पासून झुम द्वारे लाईव्ह दररोज 5 जुन पर्यंत आयोजन करण्यात आला.

या मधून विद्यार्थांना ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले. विविध मान्यवरांचे व तज्ञ प्राध्यापक मंडळाद्वारे लाईव्ह ज्ञानदानाचे पवित्र कार्य या लॉकडाऊन च्या काळात यशस्वीपणे करण्यात आले.माहीती व तंत्रज्ञानाच्या काळात आपल्या शिक्षकांना सोबत घेवून प्राचार्य बी.एम.गाढवे यांनी या ऑनलाईन कार्यशाळा आयोजन करुन शिक्षक व विद्यार्थांना बौद्धिक ज्ञान संपन्न होण्याची संधी प्राप्त करुन दिली.समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मुरलीधर राजनेकर गटशिक्षणाधिकारी धामनगावरेल्वे हे होते.प्रमुख अतिथी संस्था अध्यक्ष सुधिर शेंडे यांनी अश्या कार्यशाळा मधून विद्यार्थांचा विकास होतो व त्यांना संधी प्राप्त होते.त्यासाठी टिमवर्क महत्वपूर्ण आहे असे सांगीतले . वसंतराव गुल्हाने संचालक अ.शि.संस्था म्हणाले विद्यार्थी देशाचे भवितव्य आहे त्याकडे शिक्षकांनी लक्ष केन्द्रींत करावे.प्रा.डा? संजय शेणमारे यांनी शिक्षकांनी तंत्रज्ञानाची मदत घ्यावी असे आव्हान केले.उपाध्यक्ष अशोक गुल्हाने , प्रा.डा?.सुलभा कडू सचिव प्रमोद हटवार व अनेक विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक मंडळाद्वारे फिडब? क देण्यात आले.सहभागी रजिष्ट्रेशन करणारूयाना इमेल द्वारे सर्टिफिकेट देण्यात येईल . सुत्रसंचालन प्रा अतुल ठाकरे यांनी केले. आभार प्रा.दिपक अंबरते यांनी मानले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बातमी लेखन यावरील प्रश्न विचारुन उदा. बातमीचे शीर्षक कोणते? बातमीचा शिरोभाग कोणता? गटात चर्चा करून विद्यार्थ्यांना असलेली माहिती जाणून घ्यावी.

सक्षम बनू या



(१) तुफान आलं... अन् गाव पाणीदार झालं...

उत्तर : दिनांक १० जून : सातारा (आमच्या वार्ताहराकडून)

मे महिन्याच्या अखेरीस वळवाचा पाऊस तुफानाच्या रूपात आला आणि कुकुडवाडी गाव पाणीदार झाले. कायम दुष्काळग्रस्त असणारे गाव वळवाच्या पावसाने काही वेळातच पाण्याने भरले. सारे गावकरी या घटनेमुळे आनंदित झाले.

गावकऱ्यांच्या बरोबर शहरात व परदेशात राहणाऱ्या ग्रामस्थांनीही या घटनेबाबत समाधान व्यक्त केले.

या सर्वांना आनंदित होण्याचे कारणही तसेच होते. गावातील सानथोर मंडळी आणि शहरात, परदेशात नोकरीनिमित्त बाहेर गेलेली मंडळी यांनी एकत्र येऊन साताऱ्यातील कुकुडवाडी गावातील दुष्काळावर मात केली आहे.


गेले दोन महिने सगळ्यांनी रात्रंदिवस मेहनत करून लाखो लीटर पाणी वाचेल एवढे चर खणले. बंधारे बांधले. डोंगरमाथ्यावरून येणारे पाणी या बंधाऱ्यांमुळे अडवून धरले जाईल अशी योजना केली. या सर्व मेहनतीचे फळ गावाला मिळाले. भविष्यात जूनपासून येणाऱ्या पावसामुळे गावातील पाण्याचे दुर्भिक्ष मिटेल अशी अपेक्षा सर्वत्र व्यक्त केली जात आहे.

बंधाऱ्यांनी अडवून धरलं. डोळ्या डोळ्यांत पाणी तराळलं. कष्टाचं फळ मिळालं. पाण्याच तुफान आलं. माणसांच्या एकजुटीनं हे साध्य केलं.

कायम दुष्काळग्रस्त असणारं हे गावं पाण्यानं भरल्यामुळे कुकुडवाडी गाव आनंदित झाले आहे. गावकऱ्यांबरोबरच शहरात, परदेशात नोकरी करणाऱ्या अनेक ग्रामस्थांचाही या कार्याला आर्थिक हातभार लागला होता. ••

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बातमीचे निरीक्षण करून बातमी लेखनासाठी असणारे घटक समजून द्यावे. मुख्य मथळा, शीर्षक, उपशीर्षक, उचित दिनांक, ठिकाण, बातमीस्रोत .

पहिल्या पिरिच्छेदांमध्ये महत्त्वाचा भाग त्यानंतरचे सविस्तर वृत्त इ. बातमी लेखनासाठी असणारे महत्त्वाचे भागाची माहिती द्यावी.



मुंबईतील महिला पर्यटकाचा माथेरान येथे दरीत पडून मृत्यू

उत्तर : दिनांक १२ जुलै : माथेरान : आमच्या प्रतिनिधीमार्फत.

माथेरान येथे फिरण्यासाठी आलेल्या मुंबईतील एका महिलेचा सेल्फी काढण्याच्या प्रयत्नात १२०० फूट खोल दरीत कोसळून मृत्यू झाल्याची घटना ११ जुलै रोजी संध्याकाळी घडली. सुमारे चार तासांच्या प्रयत्नांनंतर महिलेचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. वंदना चव्हाण (३२) असे या महिलेचे नाव असून माथेरानच्या लुईसा पॉइंट येथे ही घटना घडली.

पावसाळ्याच्या निसर्गरम्य वातावरणात अनेक पर्यटकांची पावले माथेरानकडे वळतात. मुंबईतील चव्हाण कुटुंब आपल्या दोन मुलींसह माथेरानला पर्यटनाला आले होते. सायंकाळी हे सर्वजण माथेरानच्या प्रसिद्ध लुईसा पॉइंट येथे फिरायला गेले होते. या वेळी वंदना या आपल्या पतीसमवेत कड्याजवळ उभे राहून सेल्फी काढत असताना, जोरदार वाऱ्यामुळे वंदना यांचा तोल गेला आणि त्या १२०० फूट खोल दरीत कोसळल्या.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि अपघात झालेल्या कुटुंबीयांना साहाय्य केले. सेल्फीच्या मोहात पडून आजवर अनेक पर्यटकांनी आपले जीव गमावले आहेत. सेल्फीचा मोह टाळावा. सुरक्षितपणे पर्यटनाचा आनंद घ्यावा असे पर्यटनप्रेमींनी आवाहन केले आहे. ••

शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना आदर्श बातमी कशी लिहावी याचे सविस्तर मार्दर्शन करावे.

चला सराव करू या

खालील विषयावर बातमी तयार करा .

१. जनता गर्ल्स् हायस्कूल, शेंदुरजना घाट मध्ये वसुंधरा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

२. शिवाजी हायस्कूल , मोर्शी चा सुवर्ण महोत्सव मा. शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

कल्पक होऊ या

१. तुमच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवर आधारित बातमी तयार करा.

२. वर्तमानपत्रातातील बातम्यांचे शीर्षक/मथळा, स्थळ, स्रोत , दिनांक या सारख्या घटकांचा अभ्यास करावा.

दिवस

३३

क्षेत्र - लेखन: क्षमता /कौशल्य

लेखन करताना समानार्थी शब्दाचा वापर करता येणे.

संकल्पना:-

समानार्थी शब्द

जाणून घेऊ या

आई आज सकाळी लवकर उठली. पाणी भरले. सकाळची जेवणाची तयारी केली. आज आम्हाला तिने बागेत जायचे वचन दिले होते. बागेत जाण्यासाठी मी सकाळपासूनच तिच्या मागे लागलो. माझी बहिण आईला कामात मदत करत होती. मी आईला दुकानातून काही सामान आणायला मदत केली. सायंकाळी मी आई व ताई बागेत गेलो. बागेत खूप फुले होती. आई एका झाडाखाली बसली. जोराचा वारा सुटला होता. झाडावरून पाने पडत होती. मुले खेळात दंग झाली होती. आज मला खूप आनंद झाला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उतारा लक्षपूर्वक वाचण्यास सांगून विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. किंवा गटात चर्चा करावी.

वरील उतारा वाचून उताऱ्यावरील कृती सोडवा .

१ उताऱ्यातील अधोरेखित केलेल्या खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

१ आई २ पाणी ३ फुले ४ झाड

२ खालील शब्दांच्या समान अर्थाचे शब्द उताऱ्यात शोधा.

१ सहाय्य २ पर्ण

३ खालील समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

'अ' गट	'ब' गट
१) पवन	क)बहीण
२) भगिनी	ख) आनंद
३) हर्ष	ग) सामान
४)साहित्य	च) वारा

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील प्रमाणे विविध उदाहरणे देऊन समानार्थी शब्द ही संकल्पना जाणून घ्यावी.

सक्षम बनू या

१ आज त्याचा चेहरा सुंदर दिसत होता.

२ त्याचे मुख गोऱ्या रंगाचे आहे.

३ तो समाजाचा नायक होता.

४ तो आमचा नेता आहे.

५ सर्वत्र काळोख पसरला होता.

६ बघता बघता अंधारात तो गायब झाला.

७ तिमिर वाटेने चाललात तर धडपडणारच.

शिक्षकांनी वरील वाक्यांत आलेले समानार्थी शब्द शोधण्यास सांगून समानार्थी शब्द या घटकाची ओळख करून द्यावी.

खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.

१ वन x ---------	**१ आभाळ** x---------
२ वाट x ---------	**२ हात** x ---------
३ गरीब x --------	**३ मोर** x--------
४ धरणी x ---------	**४ पोपट** x ---------
५ दिन x----------	**५ देव** x----------
६ मुख x----------	**६ पिता** x----------

शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरणाच्या मदतीने समानार्थी शब्द ही संकल्पना समजून द्यावी. अधिक सरावासाठी अशा प्रकारच्या विविध कृती सोडवून घ्याव्यात.

चला सराव करू या

भूमी, ग्राम, मूक, देव ,ईश्वर ,सरिता, जीभ,
रसना, बळ, मित्र ,काया, सखा, शीर, शव,
धरती, कलेवर, पंख ,अबोल पर, गांव, शरीर
,पक्षी, डोके ,नदी, पाखरू, ताकद

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उदाहरणातील एकाच अर्थाचे दोन शब्द शोधण्यास सांगून समानार्थी शब्द ही संकल्पना अधिक स्पष्ट करून द्यावी अशाप्रकारच्या अधिक उदाहरणांचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या

- पाठ्यपुस्तकातील विविध पाठातून आलेल्या समानार्थी शब्दांचा शोध घ्या.
- आंतरजालाचा वापर करून समानार्थी शब्द या घटकाची अधिक माहिती मिळवा.
- समानार्थी शब्दांच्या अर्थच्छटा शोधण्याचा प्रयत्न करा.
  उदा. पत्नी,दारा,आर्या, अर्धांगिनी, बायको

दिवस

३४

क्षेत्र - लेखन: क्षमता /कौशल्य

पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकावर लेखन करता येणे.

संकल्पना - बातमी लेखन

जाणून घेऊ या



वैद्यकीय दुसऱ्या, तिसऱ्या वर्षाच्या परीक्षा गुरुवारीच

■ राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाची भूमिका

वृत्तसंस्था/८ जून

मुंबई-राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा 10 जूनपासून घेण्यावर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ ठाम आहे. नियोजित वेळापत्रकात कुठलाही बदल होणार नसल्याचे आरोग्य विज्ञान विद्यापीठाने स्पष्ट केले.

या परीक्षा कोरोनाची स्थिती पाहता पुढे ढकलल्या जाव्या किंवा आभासी घेतल्या जाव्या, अशी मागणी विद्यार्थी आणि विविध संघटनाकडून केली जात होती. मात्र, उच्च न्यायालयाच्या आणि केंद्रीय परिषदेच्या निर्देशानुसार या परीक्षा आभासी घेणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले. या परीक्षा आभासी घेण्याबाबतची याचिका न्यायालयाने यापूर्वीच फेटाळली असल्यामुळे परीक्षा 10 जूनपासून वेळापत्रकानुसार ऑफलाईन होणार असल्याचे परिपत्रक विद्यापीठाकडून सोमवारी सायंकाळी काढण्यात आले. विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी कोरोना अहवाल नकारात्मक असणे बंधनकारक असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचा कोरोना अहवाल सकारात्मक आहे, त्यांना परीक्षा देता येणार नाही. त्यांच्यासाठी वेगळी परीक्षा घेतली जाणार आहे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील बातमी काळजीपूर्वक पाहण्यास सांगून त्यातील सर्व घटकाचे अवलोकन करुन गटात चर्चा करण्यास सांगावी.


शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील बातमीच्या आधारे खालील प्रश्न विचारून त्यांना असणारी माहिती जाणून घ्यावी.

- बातमीचा विषय कोणता आहे?
- बातमीचे शीर्षक कोणते आहे?
- बातमीचा स्रोत
- बातमीचे स्थळ व दिनांक

या सारखी आणखी प्रश्न शिक्षकांनी विचारावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बातमीलेखनासाठी महत्वाच्या असणाऱ्या भागाची माहिती द्यावी . खालीळल बातमीचे निरीक्षण करून बातमी लेखनासाठी मार्गदर्शन करावे.



पहिल्या परिच्छेदांमध्ये महत्त्वाचा भाग त्यानंतरचे सविस्तर वृत्त इ. बातमी लेखनासाठी असणारे महत्त्वाचे भागाची माहिती द्यावी.



मंगळवारी 201 पॉझिटिव्ह, 5 मृत्यू

बाधितांची संख्या 94,490

४०९ रुग्णांना डिश्चार्ज

प्रतिनिधी / ८ जून

अमरावती - गेल्या काही दिवसांपासून अमरावती जिल्ह्यात कोरोनाचा आलेख सातत्याने घसरला असल्याचे दिसून येत आहे. मंगळवारी संक्रमीत रुग्णांची संख्या पुन्हा कमी झाली असून २०१ रुग्णांची नोंद झाली आहे.

जिल्ह्यात कोरोना बाधितांचा आकडा ९४ हजार ४९० वर पोहचला आहे. मंगळवारी २४ तासात जिल्ह्यात ५ कोरोना बाधित रुग्णांचा मृत्यु झाल्याने कोरोना मृतकांचा आकडा १ हजार ५१६ वर पोहचला आहे.

मंगळवारी मृतक ५ रुग्णांपैकी १ शहरातील तर ४ रुग्ण ग्रामीण भागातील आहेत. त्यासोबतच मंगळवारी जिल्ह्यात ४०९ रुग्णांना कोविड मुक्त झाल्याने डिश्चार्ज देण्यात आलेला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एकुण ९० हजार ८ रुग्ण कोरोना मुक्त झाले आहे. सध्या जिल्ह्यात एकुण ॲक्टीव्ह पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या २ हजार ९७१ आहे. यापैकी महापालिका क्षेत्रातील ६२४ तर ग्रामीण परिसरातील २ हजार ३५२ कोविड रुग्णांवर उपचार सुरु आहे. तसेच महापालिका क्षेत्रात ४२५ व ग्रामीण भागात १ हजार ६९० रुग्ण गृह विलगीकरणात आहेत. गेल्या २४ तासात ६ हजार ७७४ नागरिकांची कोविड टेस्ट करण्यात आली. त्यापैकी २.९६ टक्के अवहाल पॉझिटिव्ह प्राप्त झाला आहे. तसेच कोविड मुक्त रुग्णांचे प्रमाण वाढले असून ९५.२६ टक्क्यावर पोहचले आहे.

शिक्षकांनी खालील प्रमाणे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना आदर्श बातमी कशी लिहावी याचे सविस्तर मार्गदर्शन करावे.

प्लास्टिक जनजागृती
(न्यूज नेटवर्क जनमत)

मुंबई, दिनांक १९ जून : पर्यावरणाच्या संरक्षणासाठी तसेच भावी पिढीला आरोग्यदायी वातावरण लाभावे यासाठी शासनामार्फत प्लास्टिकबंदीचा निर्णय घेण्यात आला आहे.

येत्या २३ जूनपासून संपूर्ण महाराष्ट्रभर प्लास्टिकबंदी लागू होणार आहे. त्यामुळे काही अपवादात्मक प्लास्टिक सोडल्यास प्लास्टिक वापरावर मोठ्या प्रमाणात मर्यादा येणार आहे.

प्लास्टिकबंदी होण्यापूर्वी प्लास्टिकला काय पर्याय असू शकतात, याची माहिती मुंबईकरांना देण्यासाठी महानगरपालिकेने २२ ते २४ जून दरम्यान वरळीत एक प्रदर्शन आयोजित केले आहे. या प्रदर्शनात मुंबईकर नागरिकांनी प्लास्टिकच्या पिशव्या जमा कराव्यात, अशी अपेक्षा सूत्राकडून व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच प्लास्टिकला पर्याय असलेल्या कॅनव्हास, ज्यूट, कागदी पिशव्या यांचा वापर वाढावा, म्हणून जनजागृती करण्यात येणार आहे. पिशव्या बाटल्या किंवा प्लास्टिकचे रिसायकल कसे व कुठे करता येईल, याची माहिती या प्रदर्शनात उपलब्ध होणार आहे

चला सराव करू या

खालील विषयावर बातमी तयार करा .

३. सत्र २०२० -२०२१ ची दहावीची परीक्षा रद्द करण्यात आली.

४. गेटवे ऑफ इंडियावर योगसाधना .

५. नागपूरातील सर्वांत सुंदर शाळा

६. काडसिद्धेश्वर हायस्कूल, कोल्हापूर. येथे 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा .

कल्पक होऊ या

१. तुमच्या शाळेत होणाऱ्या विविध कार्यक्रमांवर बातमी तयार करा.

२. चालू घडामोडींवर आधारित बातम्या तयार करा.

३. दूरदर्शन वरील बातम्या पाहून स्वत: बातमी तयार करा.

दिवस

३५

क्षेत्र - उपयोजित लेखन

क्षमता : पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकावर लेखन करता येणे.

क्षेत्र - उपयोजित लेखन

संकल्पना -पत्रलेखन

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील पत्र काळजीपूर्वक पाहण्यास व त्यातील सर्व घटकाचे अवलोकन करुन गटात चर्चा करण्यास सांगावे.

दिनांक ----------

प्रती,

माननीय ----------

विषय : ----------

महोदय,

कळावे,


आपला विश्वासू

सांगली

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील पत्रलेखनाचे प्रारूप दाखवून पत्र लेखनासाठी असणाऱ्या घटकाची सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांना असलेली माहिती जाणून घ्यावी.

- उदा. पत्राचे एकूण प्रकार किती?
- प्रकारातील फरक कोणता?
- पत्रलेखन करतांना कोणती दक्षता बाळगावी?
- पत्राची सुरुवात व शेवट कसा करावा?
- यावर्षी पत्रलेखनाचे कोणते प्रकार अभ्यासाला आहेत?

सक्षम बनू या



➢ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील पत्राचे निरीक्षण करून पत्रलेखनातील सर्व घटकाची माहिती करून द्यावी. खालील कृती विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावी.

कृती सोडवा

१. वरील पत्राचा प्रकार कोणता आहे?

२. पत्र कोणाला लिहिले आहे?

३. पत्राचा विषय कोणता आहे ?

४. पत्र कोणी लिहिले आहे ?

चला सराव करू या

➢ शिक्षकांनी खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना उदाहरणे देवून पत्रलेखनाचा सराव करून घ्या.

शिक्षकांनी खालील निवेदन विद्यार्थ्यांना वाचण्यास सांगून पत्रलेखनाचा सराव करून घ्यावा.

पर्यावरण वाचवा, देश वाचवा

उमेद फौंडेशन,कोल्हापूर

टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन

दिनांक २० जून ४ ते ६	प्रवेश शुल्क नाही	प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी स्वपरिचय पत्र संबधित संस्थेस लिहा .	कार्यशाळेत तयार झालेल्या वस्तूंची मागणी करणारे पत्र संबधित संस्थेस लिहा.

शिक्षकांनी अशा प्रकारची विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्याकडून पत्रलेखनाचा सराव करून घ्यावा.

निवेदन वाचून सराव करणेसाठी खालील कृती सोडवा .

- वरील निवेदनात पत्र ज्या संस्थेला लिहावयाचे आहे त्या संस्थेचे नाव काय ?
- कार्यशाळा कोणत्या तारखेला व कोणत्या वेळी आहे ?
- कार्यशाळेसाठी प्रवेश शुल्क किती आहे ?

कल्पक होऊ या

कल्पक होऊ या...

- तुमच्या आजूबाजूला असणाऱ्या समस्यावर संबधित अधिकाऱ्यांना पत्र लिहा.
- दिक्षा ॲपच्या मदतीने पत्रलेखनासाठी उपयोग घ्या.

दिवस
३६

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य
लेखन करताना विरुदधार्थी शब्दाचा वापर करता येणे.

संकल्पना:
विरुदधार्थी शब्द

जाणून घेऊ या

पुढील उदाहरणाच्या सहाय्याने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उतारा लक्षपूर्वक वाचण्यास सांगून विरुद्ध अर्थांच्या शब्दांचा शोध घेण्यास सांगावे.

दिवस मावळला. गाय-म्हैस घराकडे परतली. सोपानने बैलगाडीतून वैरण आणली.सर्व जनावरे गोठयात बांधली ; परंतु आज त्याचे लाडके कोकरू घराकडे परतले नव्हते. तो सारखा आतबाहेर करू लागला. कोकराचे काही बरे-वाईट तर झाले नसावे या विचाराने तो दु:खी झाला. इकडे–तिकडे तो शोध घेऊ लागला. त्याने घराच्या डाव्या-उजव्या बाजूला असणाऱ्या शेजाऱ्यांकडे चौकशी केली. पण काहीच समजेनासे झाले. रात्र वाढत चालली. तशी त्याची भीती वाढत गेली. नको ते विचार त्याच्या मनात येऊ लागले कोण्या शत्रूने डाव तर साधला नसेल . या विचारात रात्र कशीबशी काढली. सकाळी त्याचा जिवलग मित्र त्याच्या लाडक्या कोकरासह दारात पाहून त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला.

उतारा वाचून उताऱ्यावरील कृती सोडवा.

१ उतारा वाचून खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द शोधून लिहा.

१ दिवस २ आत ३ मित्र ४ दु:ख

२ खालील शब्दांच्या उलट अर्थाचे शब्द उताऱ्यात शोधा.

१ इकडे २ वाईट

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील उदहरणांच्या विरुद्धार्थी शब्द देवून शब्द संपत्तीबद्दल जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी खालील वाक्यांत आलेले विरुद्धार्थी शब्द(उलट अर्थाचे शब्द) शोधण्यास सांगून विरुद्धार्थी शब्द या घटकाची ओळख करून द्यावी.

१ हे झाड **फार मधुर** फळे देते.
२ हे फळ **थोडे कडू** आहे.
३ तो वर्गात **सतत हजर** असे.
४ तो **कधीतरी गैरहजर** असे.
५ सर्वत्र **काळोख** पसरला होता.
६ दिवा लावल्यावर लखख **प्रकाश** पडला.

खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

१ सुंदर x ---------	**१ लांब** x---------
२ पाप x ---------	**२ मान** x ---------
३ गरीब x --------	**३ अर्थ** x--------
४ आज x ---------	**४ पात्र** x ---------
५ दिवस x----------	**५ स्वतंत्र** x----------
६ गुण x----------	**६ न्याय** x----------

शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरणाच्या मदतीने विरुद्धार्थी शब्द त्याचा वापर योग्य ठिकाणी कसा करावा हे समजून द्यावे . अधिक सरावासाठी अशा प्रकारच्या विविध कृती सोडवून घ्याव्यात.

चला सराव करू या

दुर्बोध, अपूर्ण, उत्साह, अज्ञानी, उंच, शक्य, काळे ,स्तुती, एकमत, अंत, खरेदी, उमेद, विश्वास,कठीण ,सुगंध, दोष, पास, सशक्त, अंध, श्रेष्ठ

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील शब्दांचे **विरुद्धार्थी** शब्द शोधण्यास सांगावे. **विरुद्धार्थी शब्दांच्या अधिक** उदाहरणांचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या

-

- पाठ्यपुस्तकातील विविध पाठातून आलेल्या विरुद्धार्थी शब्दांचा शोध घ्या.
- आंतरजालाचा वापर करून विरुद्धार्थी शब्द या घटकाची अधिक माहिती मिळवा.

दिवस
३७

क्षेत्र - लेखन:क्षमता

कल्पनांचा विस्तर करता येणे.

घटना,प्रसंग,स्वानुभव यांचे लेखन करता येणे

संकल्पना:–

आत्मकथन

जाणून घेऊ या

विद्यार्थी मित्रांनो आपल्या प्रत्येकालाच वाटत असतं की, माझं म्हणणं कोणीतरी ऐकावं, माझा भाव, माझा विचार कुणी तरी शांतपणे ऐकावा, तो कोणीतरी समजून घ्यावा. असं समजून घेतल्यानं आपल्याला हलकं वाटतं. चला तर मग आपण एक प्रातिनिधिक स्वरूपात खेळ खेळू सध्या कोरोना संसर्ग काळात शाळेपासून दूर असल्याने तुम्हाला कंटाळवाणे वाटत असेल. मित्र-मैत्रिणींची आठवण येत असेल या खेळातून आपण एकमेकांचे मनोगत, हृद गते जाणून घेऊ या..



लॉकडाऊन मधील
विद्यार्थ्यांचे मनोगत,आत्मकथन

टप्पे -

- शिक्षकांनी दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या कराव्यात.
- प्रस्तुत विषयाच्या संदर्भाने विद्यार्थ्यांना आपल्या मित्र-मैत्रिणींना समोर आपले हृद् गते मांडण्यास सांगावे.
- एकमेकांचे हृद् गते ऐकून घेतल्यावर वहीत १२ ते १५ ओळीत ते लिहिण्यास सांगावे.
- प्रातिनिधिक स्वरुपात हृदगते वाचून घ्यावीत.
- त्रुटी, उणिवा जाणवल्यास मार्गदर्शन करावे.
- मनोगत आत्मकथन लिहितांना प्रथमपुरुषी एकवचनी लेखन असावे, भावस्पर्शी असावे, ज्याचे आत्मवृत्त लिहितो आहोत, त्याचे अंतरंग पूर्णत: जाणून घेऊन त्याच्या सर्व संवेदनांशी समरस होऊन आपल्या लेखनाची मांडणी करावी. आधी ठळक बाबी सांगाव्यात. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

सक्षम बनू या

'मी मोबाईल बोलतोय.....' या विषयावर पंधरा ते वीस ओळीत लेखन करा.

माझी जन्म कहाणी

वेगाने झालेला प्रसार



तुमच्या शिक्षणातील उपयोग

सर्व क्षेत्रातील सहज संचार

चला सराव करू या

'मी कोसबाडची टेकडी बोलतेय.'.....

(स्रोत - पाठ क्र. ५ : एक होती समई)


कोसबाडची टेकडी अनुताई वाघ छायाचित्र





कल्पक होऊ या

‘मी कोरोना विषाणू बोलतोय’ या विषयांवर १८ ते २० ओळी लेखन करा.



दिवस

३८

क्षेत्र - लेखन: क्षमता

१ लेखन करताना लेखन नियमांचे पालन करता येणे.

२ लेखन करताना वचन या घटकाचा वापर करता येणे.

संकल्पना:-

वचन

जाणून घेऊ या

१ कुंडीत गुलाबाचे सुंदर फूल उमलले होते.
२ बागेत अनेक सुंदर फुले होती.
३ आम्ही केतनच्या शेतात आंब्याचे झाड लावले.
४ रेवाच्या गावाकडे आंबा,फणस,काजू, अशी खूप झाडे आहेत.
५ आम्ही पुस्तकाच्या गावाला भेट दिली. तेथे खूप पुस्तके होती.
६ मला स्पर्धेत पुस्तक भेट मिळाले.
७ आम्ही रस्त्याच्याकडेला गाडी थांबवली.
८ रस्त्याने अनेक गाड्या धावत होत्या.

शिक्षकानी वरील वाक्ये विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी. दोन वाक्यांतील फरक जाणून घेऊन विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी. गटात चर्चा करण्यास सांगावी.

१. वरील वाक्यांमध्ये एकवचन असणारे शब्द शोधा ?

१ ----------२ ----------३ ----------४ ----------

२ . वरील वाक्यांमध्ये अनेकवचन असणारे शब्द शोधा ?

१ ----------२ ----------३ ----------४ ----------

३ . वरील वाक्यात एकवचन व अनेकवचन असे शब्द आले आहेत. त्यांच्या जोड्या लिहा.

१ ----------२ ----------३ ----------४ ----------

शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध उदाहरणे देऊन वचन ही संकल्पना जाणून घ्यावी.

सक्षम बनू या

खालील शब्दांचे वचन ओळखा.

१ पान		४ घडयाळ	
२ वह्या		५ काठ्या	
३ खुर्च्या		६ चटई	

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने वचन या घटकाची ओळख करून द्यावी. एक वस्तू व अनेक वस्तू यांच्यासाठी असणाऱ्या शब्दांची माहिती द्यावी. सरावासाठी खालील उदाहरणे वाचून घ्यावीत.

खालील शब्दांचे वचन बदला.

१ केस----------	६ ---------- मासे
२ मूल ---------	७ ---------- गाई
३ शाळा----------	८ ---------- खिडक्या
४ वृक्ष ----------	९---------- पाकळ्या
५ घड्याळे---------	१०--------- फांदी

शिक्षकांनी वरील उदाहरणांच्या मदतीने वचन या घटकाविषयी चर्चा करून एकवचन, अनेकवचन ही संकल्पना स्पष्ट करून सांगावी.

चला सराव करू या

खालील उदाहरणामध्ये कोणते शब्द एकवचनी व अनेकवचनी आहेत ते ओळखून लिहा.

१. मुले ही देवा घरची फुले आहेत.

२. एक एक कळी जमवता जमवता तेथे कळ्यांचा ढीग तयार झाला.

३ . नदीत मासे पकडायला गेलेल्या नितीनला आज एकच मासा मिळाला.

अशी अनेक उदाहरणे सरावासाठी द्यावीत.

कल्पक होऊ या

- **कल्पक होऊ या (आव्हाने):-**
  - **पाठ्यपुस्तकातील एकवचनी अनेकवचनी शब्द शोधा.**
  - **काही शब्दांचे एकवचन आणि अनेकवचन सारखेच असते असे शब्द शोधा व यादी तयार करा.**
  - **आंतरजालाच्या मदतीने वचन या व्याकरणिक घटकाची अधिक माहिती मिळवा.**

दिवस

३९/४०

क्षेत्र - लेखन:क्षमता

घटना,प्रसंग,स्वानुभव यांचे लेखन करता येणे.

संकल्पना:–

प्रसंगलेखन

जाणून घेऊ या

विद्यार्थी मित्रांनो नमस्कार खालील चित्र बारकाईने पाहा आणि त्या चित्राविषयी तुमच्या मनात येणारे विचार सांगा.



मुलांनो पाहिलेला प्रसंग, कार्यक्रम, अनुभवलेली एखादी घटना आपण दुसऱ्याला सांगतो. त्याचे वर्णन करतो. हीच अभिव्यक्ती जेव्हा आपण लेखनातून करतो तेव्हा त्याला आपण **'प्रसंगलेखन'** असे म्हणतो. आज पर्यंत अनेकवेळा तुम्ही असे लेखन केले असेल. चला बरं, अशा एका प्रसंगाचे आपण वर्णन करूयात व नंतर ते लिहू या.

शिक्षकांनी पुढील क्रमाने विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासावे.

- विद्यार्थ्यांची निरीक्षण
- तो करीत असलेले चिंतन
- मनातील विचार, भावनांची छोट्या-छोट्या वाक्यांमध्ये तो करीत असलेली मांडणी.
- त्याची शब्द संपत्ती
- चित्रवर्णनांकडून प्रसंगलेखनापर्यंतचा प्रवास.

सात-आठ विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे वर्गाचे गट करावेत. प्रत्येक गटात स्वतंत्र चित्र देऊन परस्परात चर्चा संवाद करण्यास सांगावा. चित्राच्या अनुषंगाने काही नवीन शब्द उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना द्यावी. त्यांना अधिक सूक्ष्म व सखोल निरीक्षण करण्यास, केलेले निरीक्षण सोप्या भाषेत वर्णन करण्यास आणि त्याची लेखी मांडणी करण्यास प्रेरित करावे

सक्षम बनू या

खालील मुद्द्यांच्या आधारे तुम्ही भेट दिलेल्या प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन करा.

त्या भागातील मानवी जीवन

भौगोलिक स्थान

उल्लेखनीय बाबी



सांस्कृतिक वैशिष्ट्ये

तुम्हाला विशेष आवडलेले बाब.

मनावर ठसलेला विशेष.

चला सराव करू या

चार्ली चॅप्लिनच्या एका विनोदी कार्यक्रमास तुम्ही उपस्थित आहात अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा. त्यासाठी पुढील मुद्दे विचारात घ्या.

- चार्ली चॅप्लिनन चे स्वभाव विशेष - उदा.- हसरा चेहरा, गमती जमती, लकबी, हसवता हसवता प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आणण्याचे
- चार्लीच्या विनोदाचा प्रेक्षकांवर होणारा परिणाम.
- कार्यक्रम प्रसंगी च्या वातावरणाचे विशेष.
- प्रेक्षक म्हणून तुम्हास झालेला आनंद इ.



कल्पक होऊ या

लॉकडाऊनच्या काळात मी फुलवलेली बाग' या विषयावर प्रसंग लेखन करा. विषय विस्तारासाठी पुढील मुद्दे विचारात घ्या.

- लागवड करताना मिळालेला आनंद
- भाजीपाला लागवड
- फुलझाडांची लागवड
- कुटुंबियांचे सहकार्य
- सेंद्रिय, शेणखताचा वापर
- मोकळी जमीन/ टेरेसचा कल्पक वापर



दिवस
४१

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य
१ लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.

संकल्पना:-
लेखन नियमांनुसार लेखन

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील वाक्ये वाचण्यास सांगून विद्यार्थ्यांचे गट तयार करून गटात चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी अशा विविध उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करण्यास सांगावी. शुद्धलेखन जाणून घ्यावे.

जसे पुढील उदाहरणे पाहा.

१ एखाद्या शब्दाची व्युत्पत्ती शोधणे म्हणजे एक प्रकारचा आनंद मिळविणे.
२ एकाद्या शब्दाची उत्पत्ति सोदने म्हणजे एक परकारचा आनंद मिळविणे.
३ सुशिक्षित माणसाला समाजभान असेलच असे नाही.
४ सुशिकशीत मानसाला समाजभान असेलच असे न्हाई.
५ दरवर्षी आपल्या शाळेत शिक्षकदिन साजरा होतो.
६ दरवर्षि आपल्या शाळेत शिक्षकदीन साजरा होतो .

१ वरील उदाहरणामध्ये आलेले शुद्ध शब्द ओळखून लिहा.

१ ----------२----------३----------४----------

२ वरील उदाहरणामध्ये आलेले अशुद्ध शब्द ओळखून लिहा.

१ ----------२----------३----------४ ----------

शिक्षकानी वरील चर्चेप्रमाणे विविध उदाहरणे देऊन शुद्धलेखन ही संकल्पना विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावी.

चूक की बरोबर ते लिहा.

सकाळी --------- मुलाने -------- सीनेमा --------
राष्ट्रीय -------- वडिल -------- हायस्कुल --------
दुध -------- आजि -------- परीक्षा ---------

शिक्षकांनी वरील शब्दात व्याकरणदृष्ट्या चूक किंवा बरोबर असणारे शब्द ओळखण्यास देऊन गटात चर्चा करावी. विद्यार्थ्यांची शुद्धलेखनाची जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

शुद्ध शब्द

मी, ती, जी, ही, फी, तू, जू, धू, नि
कवी, ऋषी, शनी, पशू ,गुरु फूल, सून
आणि इति,कविता, सरिता, माहिती ,
परंतु , विद्यार्थी , तथापि,यथामति,
भीती, पूजा, नीती, पूर्व , नवीन ,संगीत
हळूहळू ,किंचित,मुळूमुळू ,नागपूर,

अशुद्ध शब्द

मि,आणी , मंदीर नविन,
परिक्षा, कवीता, हायस्कुल , वहि ,
कवि , अनुसया, आम्बा , सिह ,
गति , वरगीकरण, उस, विहिर,
एकादा, शिर्षक, आशिर्वाद,

शिक्षकांनी वरील तक्त्याच्या मदतीने शुद्धशब्द व अशुद्धशब्द या बद्दल माहिती देऊन शुद्धलेखनाचे नियम समजवावेत व शुद्धलेखन या घटकाची ओळख करून द्यावी.

वरील उताऱ्यातील शब्दांचे खालील तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.

अनुस्वार	ऱ्हस्व	दीर्घ	तत्सम शब्द

शिक्षकांनी वरील उदाहरणाच्या मदतीने अनुस्वार ,ऱ्हस्व ,दीर्घ ,तत्सम शब्द या विषयी चर्चा करून शुद्धलेखन ही संकल्पना समजून द्यावी.

चला सराव करू या

खालील उदाहरणांमधील लेखन नियमांनुसार शुद्ध शब्द ओळखा.

१ किर्ती/कीर्ती /किर्ति /कीर्ति ----------

२ दुर्दशा/दूरदशा/दूर्दशा/दुदर्शा ----------

३ वीभूती /विभूती /वीभूति/विभूति----------

४ दिपावली/दीपावलि/दीपावली/दिपावलि----------

५ निरीक्षण/निरिक्षण/निरीकशन/ निरीक्षण

शिक्षकांनी वरील उदाहरणातील अचूक शब्द ओळखण्यास सांगून अधिक उदाहरणांचा सराव करून घ्यावा .

कल्पक होऊ या

- **शुद्धलेखनाचे नियम वाचा. पाठ्यपुस्तकातील हे शब्द असेच लिहा हे पान अभ्यासा व शुद्ध लेखनाचा सराव करा.**
- **आंतरजालाचा वापर करून शुद्धलेखनाच्या नियमाची अधिक माहिती मिळवा.**
- **बोलताना जाणीवपूर्वक शुद्ध शब्दांचा वापर करा.**
- **हमखास चुकणाऱ्या शब्दांची यादी तयार करा. ('र' फार युक्त शब्द)**

दिवस
४२

क्षेत्र - लेखन: क्षमता /कौशल्य

पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकावर लेखन करता येणे.

संकल्पना - बातमी लेखन

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील बातमी काळजीपूर्वक पाहण्यास सांगून त्यातील सर्व घटकाचे अवलोकन करुन गटात चर्चा करण्यास सांगावी.

राष्ट्रीय विद्या मंदिर---शताब्दी वर्ष –मा. शिक्षणमंत्री –राष्ट्रीय हित—विविध कार्यक्रमाचे आयोजन—माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती.

राष्ट्रीय विद्या मंदिर

राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणारी पवित्र शाळा

दिनांक – १२ जून : अकोला (आमच्या वार्ताहराकडून)

आज महात्मा फुले नगरात राष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय विद्या मंदिर' या शाळेचा शताब्दी महोत्सव अत्यंत उल्हासात साजरा झाला. माननीय शिक्षण मंत्र्यांनी आपल्या भाषणात शाळेचा मुक्तकंठाने गौरव केला. ते म्हणाले, खरे तर या शाळेचा लौकिक सर्वदूर पसरलेला आहे. तरीही संस्थेचे पदाधिकारी मला शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या कीर्तिपताका दाखवत होते. त्या पाहून तर मी अचंबितच झालो. अनेक उच्चविदयाभूषित, अनेक क्षेत्रांतले नामांकित, उदयोगपती, विचारवंत, समाजसुधारक, कलावंत, साहित्य, राजकारणी यांची आरास मांडलेली होती म्हणा ना! गेल्या शंभर वर्षांत या देशाला काय दिले, त्याचे अत्यंत लोभसवाणे दर्शन घडत होते. "

सोहळ्याच्या सुरुवातीलाच एक सादरीकरण झाले. त्यात या शाळेचा संपूर्ण इतिहास कथन केलेला होता. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने देशभर राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करण्यासाठी शाळांची निर्मिती झाली. त्यांपैकीच 'राष्ट्रीय विद्या मंदिर' या शाळेची स्थापना झाली. एका लहानशा रोपट्याचे महावृक्षात रूपांतर झाले होते. राष्ट्रीय वृत्तीचे, देशभक्ती मुरलेले विद्यार्थी घडवण्याचा संकल्प कल्पनेपेक्षाही यशस्वी झाला होता. शाळेने सुरुवातीपासूनच कल्पकतेने अनेक उपक्रम राबवले. जीवनाच्या विविध क्षेत्रांत शिरण्याची प्रेरणा विदयार्थ्यांमध्ये निर्माण केली. त्याचे दृश्य फळ समोर बसलेल्या श्रोत्यांमध्ये दिसत होते. समोर बसलेल्या सर्व नामवंतांमध्ये बहुसंख्य शाळेचे माजी विद्यार्थीच होते. संस्थेच्या अध्यक्षांनी शाळेची कामगिरी नम्रपणे कथन केली. गेली काही वर्षे शाळेचे माजी विद्यार्थी

शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत 'बातमी लेखन' यावरील मुद्द्याच्या आधारे बातमी कशी लिहावी घटकांविषयी चर्चा करावी. शीर्षक/मथळा कसा लिहावा याविषयी विध्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांचे पूर्व ज्ञान जाणून घ्यावे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खाली दिलेल्या मुद्द्याच्या आधारे बातमीचे लेखन करण्यासाठी असणारे घटक समजून द्यावेत.



तुफान—दुष्काळ— पावसाचे पाणी ---- बंधारे – कष्ट ----श्रमदान—जलसाक्षरता

गाव पाणीदार झालं !

(आमच्या वार्ताहराकडून)

सातारा, दि. १० जून मे महिन्याच्या अखेरीस वळवाचा पाऊस तुफानाच्या रूपात आला आणि कुकुडवाडी गाव पाणीदार झाले. कायम दुष्काळग्रस्त असणारे गाव वळवाच्या पावसाने काही वेळातच पाण्याने भरले. गावकऱ्यांच्या बरोबर शहरात व परदेशात राहणाऱ्या ग्रामस्थांनीही या घटनेबाबत समाधान व्यक्त केले.

या सर्वांना आनंदित होण्याचे कारणही तसेच होते. साऱ्या गावकऱ्यांनी एकत्र येऊन साताऱ्यातील कुकुडवाडी गावातील दुष्काळावर मात केली आहे.

शीर्षक , वेळ, दिनांक, स्थळ, पहिल्या परिच्छेदांमध्ये महत्त्वाचा भाग त्यानंतरचे सविस्तर वृत्त इ. बातमी लेखनासाठी असणाऱ्या महत्त्वाच्या भागाची माहिती द्यावी.

शिक्षकांनी खालील प्रमाणे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना आदर्श बातमी कशी लिहावी याचे सविस्तर मार्दर्शन करावे.

चला सराव करू या

खालील विषयावर बातमी तयार करा .

१) कोरोना –साथ –रुग्णसंख्या –विलगीकरण – जिल्हा

२) काश्मीर—दहशदवाद—वीरमरण—आधारस्तंभ—अभिमान

३) उपक्रम –तंत्रज्ञान मैत्री –विद्यार्थी—पालकांना मार्गदर्शन

कल्पक होऊ या

- तुमच्या परिसरात घडणाऱ्या सामाजिक घटनांवर आधारित बातमी तयार करा.
- चालू घडामोडींवर आधारित तोंडी बातमी गटात सांगा.
- वर्तमानपत्रातातील बातम्यांचे शीर्षक, मथळा, स्थळ, स्रोत, दिनांक या सारख्या घटकांचा अभ्यास करावा.

दिवस

४३

क्षेत्र - लेखन:क्षमता /कौशल्य


१ लेखनामध्ये विराम चिन्हांचा वापर करता येणे .

संकल्पना:-

विरामचिन्हे

जाणून घेऊ या

पुढील नमुना कृतीच्या साहाय्याने शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे विरामचिन्हांबद्दलचे पूर्वज्ञान जाणून घ्यावे.



अर्धविराम, उद् गार चिन्ह, पूर्णविराम, संयोग, दुहेरी अवतरण चिन्ह, अपूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील चौकटीतील चिन्ह ओळखण्यास सांगून चिन्हाच्या बाणासमोर चिन्हाचे नाव लिहिण्यास सांगावे. विद्यार्थ्यांशी चर्चा करावी किंवा गटात चर्चा करावी.

खालील वाक्यातील ठळक शब्दाजवळ असणारे विरामचिन्हे ओळखा. पुढील चौकटीत चिन्हाचे नाव लिहा.

२) आजीच्या डोक्यावर एकही काळा केस **नव्हता.** _____

३) मला **‘श्यामची आई’** हे पुस्तक फार आवडते. _____

४) सर्वेशला **आंबा,द्राक्षे,पेरू, केळी** इ. फळे आवडतात. _____

५) ते म्हणाले, **“लक्षात नाही आलं !”** _____

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे विविध उदाहरणे देऊन **विरामचिन्हे** ही संकल्पना समजून सांगावी.

सक्षम बनू या

खाली दिलेल्या वाक्यांमध्ये विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.

१ तुमचे केस अजून काळे कसे राहिले आहेत

२ एकाएकी रमेश पाय घसरून पडला

३ मी कशाची जाहिरात करीत आहे

४ आम्ही लहानपणी कबड्डी भोवरा गोट्या लंगडी असे खेळ खेळायचो

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील वाक्यांत विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहिण्यास सांगून **विरामचिन्हे** या घटकाची ओळख करून द्यावी.

खालील विरामचिन्हे ओळखून त्याचे नाव लिहा.

१ -	
२ .	
३ ,	
४ ‘ ’	
५ ;	
६ ?	

शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरणाच्या मदतीने **विरामचिन्हे** ही समजून द्यावी. अधिक सरावासाठी अशा प्रकारच्या विविध कृती सोडवून घ्याव्यात.

चला सराव करू या

जोड्या लावा.

'अ' गट	'ब' गट
१ संयोग चिन्ह	क) ;
२ अर्धविराम	ख) ?
३ एकेरी अवतरण चिन्ह	ग) -
४ प्रश्नचिन्ह	घ) ' '

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे देऊन विरामचिन्हांचा शोध घेण्यास सांगावे. विरामचिन्हे म्हणजे काय ? वापराचे फायदे, विरामचिन्हांचे प्रकार विरामचिन्हे चुकीच्या ठिकाणी वापरल्याने होणारी गंमत अशाप्रकारच्या अधिक उदाहरणांचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या

- पाठ्यपुस्तकातील विविध पाठातून आलेल्या विरामचिन्हांचा शोध घ्या.
- आंतरजालाचा वापर करून विरामचिन्हे या घटकाची अधिक माहिती मिळवा.
- विरामचिन्हाशिवाय एक उतारा वाचा व फरक लक्षात घ्या.

दिवस

४४

जाणून घेऊ या

क्षेत्र - उपयोजित लेखन

क्षमता : पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकावर लेखन करता येणे.

संकल्पना-

पत्रलेखन

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील पत्र काळजीपूर्वक पाहण्यास व त्यातील सर्व घटकाचे अवलोकन करुन गटात चर्चा करण्यास सांगावे.

दिनांक: २० जानेवारी २०१९

प्रिय नम्रता,

सप्रेम नमस्कार. सर्वप्रथम तुझे मनःपूर्वक अभिनंदन! सुप्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांच्या सुलेखन कार्यशाळेत तुला 'उत्कृष्ट सुलेखनकार' म्हणून सन्मानित करण्यात आले, ही खूपच कौतुकास्पद बाब आहे. असा सन्मान, तो ही त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या हस्ते... अशी संधी सर्वांनाच मिळत नसते, खूप भाग्यशाली आहेस तू!

मुळातच तुझे अक्षर मोत्यासारखे टपोरे आहे. त्यातच तू सुलेखन कार्यशाळेत लेखनाच्या विविध शैली शिकलीस, त्यामुळे तुझ्या हस्ताक्षराला चार चाँद लागले बघ! या सुलेखन कलेची अशीच साधना करत राहा. म्हणजेच कालांतराने तू ही या क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून नावाजली जाशील.

यापुढेही तुझ्याकडून अशाच गौरवास्पद कामगिरीची अपेक्षा आहे. तुझ्या नम्र स्वभावामुळे व गुणी व्यक्तिमत्वामुळे तू खूप मोठी व्यक्ती बनशील. तुझ्या सर्व प्रयत्नांना परमेश्वर यश देवो, हीच सदिच्छा!

तुझे पुन्हा एकदा खूप खूप अभिनंदन!

त्यांना माझा शिरसाष्टांग नमस्कार कळव. छोटया बेबीला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत पत्रलेखनाच्या वैशिष्ट्यांबाबत सविस्तर चर्चा करून त्यांचे पूर्वज्ञान जाणून घ्यावे. उदा.

- पत्राचे एकूण प्रकार किती?
- पत्र प्रकारातील फरक कोणता?
- पत्रलेखन करतांना कोणती दक्षता बाळगावी?
- पत्राची सुरुवात व शेवट कसा करावा?
- यावर्षी पत्रलेखनाचे कोणते प्रकार अभ्यासाला आहेत?

सक्षम बनू या

दिनांक ———

प्रति, ———

माननीय ———— ,

————

विषय : ———

महोदय,

————————

मुख्य मजकूर

आपला/आपली


————

पत्ता

————

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

➢ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील पत्र- प्रारूपाचे नमुन्याचे निरीक्षण करण्यास सांगावे. सर्व घटकाची विस्तृत माहिती द्यावी.



शिक्षकांनी वरीलप्रमाणे उदाहरणे देऊन खाली दिलेल्या प्रमाणे आदर्श पत्रलेखनाचा नमुना लिहून द्यावा.

चला सराव करू या

दिनांक : १३ जून २०२१

प्रति,

माननीय सुनंदा केळकर

शिबिर संयोजक व प्रशिक्षक,

५, सेवासदन,

ना. सी. घाग मार्ग,

औरंगाबाद ४३१००१

विषय: योगासन प्रशिक्षण वर्गात प्रवेश मिळणेबाबत.

माननीय महोदया,

मी अ.ब.क, रानपाखरं विद्यालयाची विद्यार्थिनी. 'आरोग्यम्' या संस्थेतर्फे आयोजित आपल्या योगासन प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी मी इच्छुक आहे. खास शालेय विद्यार्थ्यांकरता आयोजित करण्यात आलेल्या या निःशुल्क योगासन प्रशिक्षणवर्गाला इतर शाळांतील विद्यार्थ्यांचाही प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे नावनोंदणी करूनसुद्धा माझा प्रवेश निश्चित झाला नाही. विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे मला या वर्गात बसण्याची संधी मिळेल की नाही याची शंका आहे.

मी या प्रशिक्षणवर्गात सहभागी होण्यासाठी खूप उत्सुक आहे. आपण मला या प्रशिक्षणवर्गात प्रवेश मिळवून दयावा. ही नम्र विनंती.

प्रस्तुत विनंतीला मान देऊन आपण मला आपल्या शिबिरात सहभागी करून घ्याल याबद्दल विश्वास वाटतो.

आपली विश्वासू,

अ.ब.क,

३०२, आकांक्षा

विद्या सदन,


एल. बी. एस. रोड,


औरंगाबाद- ४३१००१

xxxx@gmail.com

कल्पक होऊ या

शिक्षकांनी पत्रलेखनाच्या खालील नमुन्यांचा विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा.





शिक्षकांनी वरीलप्रमाणे आणखीही उदाहरणे देऊन सराव करून घ्यावा.

दिवस
४५

चाचणी क्रमांक – ३

कृती :- अ) खालील उतारा लक्षपूर्वक वाचा व त्यावर आधारित कृती सोडवा. (७)

उतारा :

अण्णांचा निरोप घेऊन ----------

---------- व मलाही गमत नसे.


कृती-

१) पुढील विधाने पूर्ण करा. (२)

अ) अण्णा राहत त्या भागाचे नाव------

आ) अण्णाच्या गुरुचे नाव----------

२) आकृतीबंध पूर्ण करा. (२)



३) तुम्हाला तुमच्या आयुष्यात लाभलेल्या प्रेरक, आदर्श व्यक्तीविषयी सहा ते आठ ओळी लिहा. (3)


कृती – ब) पुढील कविता वाचा आणि त्यावर आधारित कृती सोडवा (८)

रंगरंगुल्या, सानसानुल्या ----------

---------- खाऊ खावा. तुझ्या सवे.

कृती : -

१) आकृतिबंध पूर्ण करा. (२)



२) पूर्ण करा. (२)

अ) गवतफूल निरखताना पुढील गोष्टींचा विसर पडला. --------

आ) गोजिरी भाषा शिकण्याची इच्छा आहे कारण----------

3) पुढील काव्यपंक्तिचा सरळ अर्थ लिहा. (२)

"वारा घेऊन सानुले, खेळ खेळतो झोपाळा
रात्रही इवली होऊन म्हणते, अंगाईचे गीत तुला"

४) 'तुझ्यासंगती सदा रहावे, विसरुनी शाळा, घर सारे!' या ओळीतून व्यक्त होणाऱ्या भावना तुमच्या शब्दांत लिहा. (२)

क) सूचनेनुसार कृती सोडवा.(स्थूलवाचन) (3)

कोकण निसर्गसौंदर्याचे वर्णन तुमच्या शब्दांत सहा ते आठ ओळींमध्ये लिहा.

ड) योग्य जोड्या लावा. (२)

सामासिक शब्द	विग्रह
१) मसालेभात २) केरकचरा	

इ) सूचनेनुसार खालील कृती सोडवा. (१०)

१) पुढील विषयावर बातमी तयार करा. (५)

'शाळा बंद, पण शिक्षण सुरू' उपक्रमास भरघोस प्रतिसाद.

२)खालील शब्दांच्या आधारे कथालेखन करा. (५)

शेत, डोंगर, धरण, शेतकरी, मुलगा